
बुधवार, 03 ऑगस्ट 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 10
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 03 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-10 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### लसीकरण मोहिमेनंतर सीएएची अंमलबजावणी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नागरिकता संशोधन कायद्याबाबत नुकतेच एक मोठ विधान केले आहे. देशातील कोविड लसीरणाची मोहिम संपल्यानंतर लगेचच सीएएची अंमलबजावणी केली जाईल, असे त्यांनी म्हटले आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभेतील विरोधीपक्ष नेते सुवेंदू अधिकारी यांच्या भेटीनंतर त्यांना आश्वस्त करताना ते बोलत होते. सुवेंदू अधिकारी यांनी पार्लमेंट हाऊसमध्ये मंगळवारी अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पश्चिम बंगालमधील भाजपच्या कामांची माहिती त्यांना दिली तसेच पक्षाला भेडसावत असलेल्या अडचणीही सांगितल्या. या भेटीनंतर शहांनी आपल्याला सांगितलं की, बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेल्या सीएए कायद्याची कोविड लसीकरणाच्या बुस्टर डोसची मोहिम संपल्यानंतर अंमलबजावणी करण्यात येईल, अशी माहिती अधिकारी यांनी दिली. इंडियन एक्स्प्रेसने याबाबत वृत्त दिले आहे.

# 'हेराल्ड'वर ईडीची छापेमारी

## सोनिया-राहुल यांच्या चौकशीनंतर मनी लॉंडरिंगप्रकरणी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : नॅशनल हेराल्ड मनी लॉंडरिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने दिल्लीत अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत. ईडीने मंगळवारी कथित नॅशनल हेराल्ड मनी लॉंडरिंग प्रकरणाच्या संदर्भात दिल्ली आणि इतर ठिकाणी किमान डझनभर ठिकाणी छापे टाकले असून, बहादूर शाह जफर मार्गावरील 'हेराल्ड हाऊस' कार्यालयावरही ही छापेमारी सुरू आहे. नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र प्रकाशित करणाऱ्या असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या नावाने हा पत्ता नोंदणीकृत आहे.**

ईडीच्या अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर पीटीआयला सांगितले की, मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) फौजदारी कलमांतर्गत छापे टाकले जात आहेत. या प्रकरणासंदर्भात अतिरिक्त पुरावे गोळा करण्यासाठी ही कारवाई सुरू आहे. नॅशनल हेराल्ड कार्यालयात सुरक्षा रक्षकाशिवाय कोणीही उपस्थित नसल्याचे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे, कॉंग्रेस खासदार उत्तर रेड्डी यांनी ईडीच्या छाप्याला राजकीय सूड असल्याचे म्हटले आहे.

**सोनिया-राहुल यांची चौकशी**

तपास यंत्रणेने गेल्या महिन्यातच कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची चौकशी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी ईडीने 26 जुलै रोजी कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांची दुसऱ्यांदा चौकशी केली होती. या प्रकरणी ईडीने 21 जुलै रोजी सोनिया गांधी यांची पहिल्यांदा चौकशी केली होती. सोनिया गांधी यांना चौकशीसाठी




ईडी कार्यालयात बोलावल्याच्या विरोधात कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी देशभरात निदर्शने केली होती. यावेळी पोलिसांनी कॉंग्रेसच्या अनेक वरिष्ठ नेत्यांसह शेकडो कॉंग्रेस कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले होते. या प्रकरणी ईडीने राहुल गांधी यांचीही दीर्घकाळ चौकशी केली आहे. नॅशनल हेराल्डचे सर्व काम मोतीलाल व्होरा पाहत असल्याचे राहुल गांधींनी ईडीला सांगितले.

### मुंबईत दोन ठिकाणी छापेमारी

पत्रा चाळ जमीन घोटाळा प्रकरणात शिवसेना नेते संजय राऊत यांना अटक झाल्यानंतर आता पुन्हा त्यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. राऊत हे सध्या ईडीच्या कोठडीत आहेत आणि त्यांची याठिकाणी कसून चौकशी केली जात आहे. यादरम्यान आज पुन्हा ईडीकडून मुंबईतील त्यांच्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. राऊतांच्या साथीदारांशी संबंधित असलेल्या ठिकाणी हे दोन्ही छापे टाकण्यात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तपास यंत्रणेने गोरेगाव आणि सांताक्रूझ येथील दोन ठिकाणी छापे टाकले.

## चर्चेतली बातमी

### 2024 पर्यंत रस्ते अपघातांची संख्या होईल अर्धी



आधुनिक केसरी न्यूज

**इंदौर :** भारतात दरवर्षी 1.5 लाखांहून अधिक लोक रस्ते अपघातात आपला जीव गमावतात. यासंदर्भात बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मोठे वक्तव्य केले आहे. तसेच, रस्ते अपघात कमी करण्यासाठी सरकार कंबरकसून काम करत आहे. 2024 च्या अखेरपर्यंत देशातील रस्ते अपघातांची संख्या निम्म्यावर येईल, असा दावा केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमादरम्यान केला. गडकरी म्हणाले, सरकारने महामार्गांवरील ब्लॅक स्पॉट्स संपवण्यासाठी आता पर्यंत 25 हजार कोटी रुपये खर्च केले आहेत. इंदूर येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले, दर वर्षी पाच लाख रस्ते अपघातांत जवळपास 1.5 लाख लोकांचा मृत्यू होतो आणि तीन लाखहून अधिक लोक जखमी होतात. या विषयावर सरकार गांभीर्याने काम करत आहे आणि 2024 च्या अखेरपर्यंत आपघात आणि मृतांची संख्या 50 टक्क्यांपर्यंत कमी करण्यासाठी सरकारने योजना आखली आहे.

# सोशल मीडियावरील खात्यांचे डीपी बदलवून राष्ट्रध्वजाचा फोटो ठेवा

आधुनिक केसरी न्यूज

**पंतप्रधान मोदींचे देशवासियांना आवाहन**

**नवी दिल्ली :** देश स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव साजरा करतो आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने आपल्या सोशल मीडियावरील खात्यांचे डीपी बदलवून राष्ट्रध्वजाचा फोटो ठेवावा, असे आवाहन त्यांनी ट्वीटद्वारे केले आहे. आज विशेष २ ऑगस्ट आहे. स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देशात हर घर तिरंगा ही विशेष मोहीम सुरू आहे. मी माझ्या सोशल मीडियावरील डीपी बदलला आहे. तसा तुम्हीदेखील बदलवावा, असे आवाहन त्यांनी ट्वीटद्वारे केले आहे.

पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रध्वजाची रचना करणाऱ्या पिंगली व्यंकय्या यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. पिंगली व्यंकय्या यांना त्यांच्या जयंतीनिमित्त मी विनम्र



अभिवादन करतो. देशाला राष्ट्रध्वज दिल्याबद्दल राष्ट्र त्यांचे सदैव ऋणी राहिल. आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो. राष्ट्रध्वजापासून प्रेरणा घेऊन देशाच्या प्रगतीसाठी काम करत राहू, असेही ते म्हणाले. पंचतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह भापजाच्या अनेक नेत्यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यांचे डीपी बदलावून राष्ट्रध्वाजाचा फोटो लावला आहे. रविवारी (३१ जुलै) रोजी झालेल्या मन की बात कार्यक्रमातही त्यांनी नागरिकांना २ ते १५ ऑगस्ट दरम्यान सोशल मीडियावर राष्ट्रध्वजाचा डीपी ठेवावा, असे आवाहन केले होते. आपण स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण होत असताना एका गौरवशाली आणि ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होणार असल्याचेही ते म्हणाले होते.

# भारतात दहशतवादी हल्ल्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये केलेल्या दहशतवादविरोधी कारवाईत अल-कायदाचा प्रमुख अयमान अल-जवाहिरी याला ठार केले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी या बातमीला दुजोरा दिला आहे. अल- जवाहिरीच्या मृत्यूनंतर भारतात दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अल-कायदाशी संबंधित संघटनांकडून हल्ला होऊ शकतो. त्यामुळे अल-जवाहिरीच्या मृत्यूनंतर गुप्तचर खात्याकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. साधारणपणे जेव्हा-जेव्हा अल-कायदाचा नवीन उत्तराधिकारी आपली जागा सांभळतो. त्यानंतर अल-कायदाने विविध ठिकाणी हल्ले घडवून आणल्याचे याआधी दिसून आले.

२०११ साली ओसामा बिन लादेन याची हत्या करण्यात आली. त्यानंतरही दूतवासावर हल्ला करणे, विविध शहरांवर हल्ला करण्याचे प्रयत्न अल-कायदाकडून करण्यात आले. अल-जवाहिरीच्या मृत्यूनंतरही अशाच प्रकारचे हल्ले होऊ शकतात, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच अल-कायदा लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या सारख्या दहशतवादी संघटनेला मदत करत असते. त्यामुळे या संघटनेचे जे स्लिपरसेल्स आहेत, त्यांना सक्रिय करण्याचे आदेश अल-कायदा देऊ शकते, अशी माहिती समोर येत आहे.

दरम्यान, २०११ मध्ये ओसामा बिन लादेनच्या मृत्यूनंतर जवाहिरीने अल-कायदाला आपल्या ताब्यात घेतले. तो आणि लादेन हे अमेरिकेवरील ९/११ च्या हल्ल्याचे सूत्रधार होते. जवाहिरी हा अमेरिकेच्या 'मोस्ट वॉन्टेड टेररिस्ट'पैकी एक होता. तोच दहशतवादी कारवायांना पुढे नेत होता. हा दहशतवादी नेता आता राहिला नाही, असे जो बायडेन यांनी व्हाईट हाऊसच्या सायंकाळच्या भाषणात जाहीर केले.

जो बायडन यांनी, आता न्याय मिळाला असल्याची भावना व्यक्त केली.

कितीही उशीर लागला, तुम्ही कुठेही लपलात तरी, आमच्या लोकांसाठी धोका असाल तर अमेरिका तुम्हाला शोधून बाहेर काढणार, असा इशारा यानिमित्ताने बायडन यांनी दिला आहे. या हल्ल्यादरम्यान इतर कोणीही जखमी झालं नसल्याची माहिती बायडन यांनी दिली आहे.

# महाराष्ट्रावर वीज कंपन्यांची २१,५०० कोटींची थकबाकी !

## लेखा प्रक्रियेत काही विसंगती; गणनेनुसार थकबाकी १३,५०० कोटींपेक्षा जास्त नाही : व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ऊर्जा मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र त्या राज्यांच्या यादीत आहे ज्यांच्यावर वीज कंपन्यांचे सर्वाधिक २१,५०० कोटी थकबाकी आहे. 'लेखा प्रक्रियेत काही विसंगती होती. गणनेनुसार थकबाकी १३,५०० कोटींपेक्षा जास्त नाही', असे महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले. महाजेनकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय साधला आहे. आता याबाबत सुधारणा करण्यासाठी आणि केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाला कळवण्यासाठी बैठक होणार आहे, असे विजय सिंघल म्हणाले.

आम्ही आमच्या खाती आणि गणनेचे तपशील देऊ. जे दर्शविते की जेनकोसवरील आमची थकबाकी १३,५०० कोटींपेक्षा जास्त नाही, असेही विजय सिंघल म्हणाले. ऊर्जा मंत्रालयाच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, महाराष्ट्रानंतर तामिळनाडूवर २०,९९० कोटींची थकबाकी आहे. तर जेनकोसची थकबाकी वाढत आहे.

२.८ कोटींहून अधिक ग्राहकांसाठी राज्य पॉवर डिस्कॉम असलेल्या महावितरणलाही वीज बिलांद्वारे पैसे वसूल करण्याची समस्या भेडसावत आहे. ग्राहकांकडून प्रलंबित वीज बिल देयके (सबसीडीसह) म्हणून ६० हजार कोटींहून अधिक थकबाकी आहे. यापैकी राज्यातील शेतकरी आणि शेतजमीन मालकांची ४२ हजार कोटींची देयके आहेत. वसुली झाल्यास महावितरणला अधिशेष आणि नफा मिळेल, असे सिंघल म्हणाले.

शेतकऱ्यांकडून वसुली करणे कठीण असले तरी त्यांच्या पथकाने केलेल्या प्रयत्नांमुळे एका वर्षात वापरकर्त्यांकडून २,५०० कोटींची वसुली झाली. फेब्रुवारी २०२१ ते जानेवारी २०२२ दरम्यान आम्ही महावितरणमध्ये आतापर्यंतची सर्वाधिक ७६ हजार कोटी जमा केले आहे. तरीही आमची थकबाकी वाढतच आहे. आम्हाला कामकाज सुरळीत सुरू ठेवण्यासाठी ६५ हजार कोटी वापस घ्यावे लागेल, असेही सिंघल म्हणाले.


**लवकरच स्मार्ट मीटर बसवणार**

राज्यावर महावितरणचे ९,१३१ कोटी थकबाकी आहे. याचा वापर जेनकोसची थकबाकी भरण्यासाठी देखील केला जाऊ शकतो. महावितरणने ३९ हजार कोटींहून अधिक किमतीचा मोठा प्रकल्प हाती घेतला आहे. ज्यामध्ये राज्यभरात १.६६ कोटी स्मार्ट मीटर बसवण्यासाठी ११,१०५ कोटींचा आणि वीज वितरणातील तूट सुमारे ४ टक्के कमी करण्यासाठी १४,२३० कोटी समाविष्ट आहे. ज्यामुळे वार्षिक ४ हजार कोटींचा महसूल मिळेल.

**थकबाकी बऱ्या प्रमाणात कमी होईल**

स्मार्ट मीटरसाठी घर किंवा कार्यालय, उद्योगात वीज खरेदी करण्यासाठी सर्व देय द्यावे लागतील. यामुळे थकबाकी बऱ्या प्रमाणात कमी होईल. या योजनेअंतर्गत पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी अतिरिक्त १४,२६६ कोटी खर्च केले जातील. त्यामध्ये राज्यातील विविध ठिकाणी ५२७ नवीन ३३/११ केव्ही सबस्टेशनचे बांधकाम आणि ७०५ सबस्टेशनची क्षमता वाढ यांचा समावेश असेल.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# ' तेच ते...'

कशाला त्या चतकोर कागदाच्या तुकड्यासाठी पाच रुपये घालवायचे ? ' पण हे पुन्हा म्यां पामराचे केवढे अज्ञान ! ' अहो, असा हाताने लिहिलेला अर्ज चालत नाही. तो विहित नमुन्यातच हवा. ' असे उद्गार ( चेहेऱ्यावर मूर्ख कुठला ! असे भाव आणून ) मला ऐकावे लागले असते म्हणून मी तसं विचारण्याची हिंमत करत नाही.

खरोखरच असे किती ' विहित नमुने ' आपल्याला असे जागोजागी दिसतात ! आपल्या विद्यार्थ्यांसाठी, शाळेसाठी जीव तोडून, आपली शक्ती, बुद्धी पणाला लावून काम करणाऱ्या डिसले गुरुजी, वारे गुरुजी यांच्यासारख्या ध्येयनिष्ठांना अशाच ' विहित नमुन्यात ' काम केले नाही म्हणून केवढा त्रास भोगावा लागतो. झाडे लावणाऱ्या एखाद्या सयाजी शिंदे सारख्या व्यक्तीला ' विहित नमुन्यात ' अर्ज करून परवानगी घेतली होती का असे विचारले जाते ! खरे तर अशा चाकोरीबाहेर जाऊन काम करणाऱ्या व्यक्तींसाठी प्रशासनाने स्वतःहून मदतीचा हात पुढे केला पाहिजे. पण लाल फितीचा कारभार आणि त्याच्याकडून असली अपेक्षा ! अर्थात अशा चाकोरीबाहेर जाऊन काम करणाऱ्या व्यक्तींना मदत करणारे अधिकारी सुद्धा असतात. तेही त्यांना चाकोरीबाहेर जाऊन मदत करतात. पण अशा अधिकाऱ्यांची संख्या नगण्य. अडवणारेच जास्त. कारण ' विहित नमुना! ' निवृत्त झालेल्या लोकांना ज्या बँकेत त्यांचं पेन्शन असेल त्या बँकेत नोव्हेंबर महिन्यात जाऊन हयातीचा दाखला द्यावा लागतो. पण एखादी व्यक्ती जर काही कारणाने नोव्हेंबर महिन्यात जाऊ शकली नाही आणि फेब्रुवारी किंवा मार्च मध्ये बँकेत गेली, तर त्या व्यक्तीला नोव्हेंबर महिन्यात तुम्ही हयात होता, तो दाखला हवा असतो. आता जी व्यक्ती फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये हयात असते ती नोव्हेंबर मध्ये असणारच. पण नियम तो नियम. बँकेचा विषय निघाला म्हणून सांगतो. आमच्या चाळीसगाव मधील काही बँका सेवानिवृत्तांना एटीएम कार्ड सुविधा देत नाहीत. कोणीतरी एखाद्या सेवानिवृत्त व्यक्तीच्या नातेवाईकांनी त्याचा गैरवापर केला असेल, म्हणून सर्वानांच त्या सुविधेपासून वंचित ठेवले जाते. कारण विचारले तर वरून ट्रेझरीकडूनच आदेश आहेत की एटीएम कार्ड देऊ नका असे सांगितले जाते. बिचाऱ्या पेन्शनरांना रांगेत पैसे काढण्यासाठी उभे राहावे लागते. त्यातही गंमत अशी की पैसे काढण्याची स्लीप चालत नाही, त्यासाठी चेक द्यावा लागतो. दोष कदाचित त्या कर्मचाऱ्यांचा नसेलही. वरून आलेल्या आदेशाचे ते पालन करतात पण त्रास होतो तो मात्र ज्येष्ठ नागरिकांना. एखादी सेवानिवृत्त व्यक्ती जर निवृत्तीनंतर आपल्या मुलामुलीकडे इतर जिल्ह्यात राहायला गेली तर तिकडे पेन्शन लवकर ट्रान्स्फर होत नाही. आजच्या या सगळ्या ऑनलाईनच्या जमान्यात हा सगळा केवढा अन्याय ! आता भाषेच्या वापरातील काही गमतीजमती पाहू.



# आनंदी पहाट

## सत्य सांगणे महत्त्वाचे

आधुनिक केसरी

आपल्या बरोबरच आपल्या नातलगांच्या भावनांसह जीवनाचा प्रवास सहप्रवासी म्हणून करणे, स्वतःबद्दल आणि इतरांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून प्रत्येक क्षणाला विलक्षण करणे म्हणजेच आपण खरोखर आनंदी असल्याचे लक्षण असते. कारण स्वतः कोण आहोत ह्याचा विचार न करता, इंतारांमधील दोष आणि सर्व दुर्गुण स्वीकारून त्यांना आपलेसे करणे हे त्यांच्यासाठी अधिक आनंददायी ठरत असते. कारण अशा व्यक्तींना आनंद न मिळू देणे हा काही पर्याय होऊ शकत नाही, जेव्हा अशा व्यक्तींना आनंदी राहण्यास सांगितले जाते आणि ते आनंदी स्थिती प्राप्त करू शकत नाहीत, त्यांना अपयशासारखे, अपराध्यासारखे वाटत असते. एखाद्याला जे सत्य सापडते ते एक दुःखद सत्य असते, परंतु दुःखी सत्य हे आनंदी खोट्यापेक्षा श्रेयस्कर, योग्य ठरत असते. जेव्हा आपण आपल्या गरजेबद्दल प्रामाणिक असतो, तेव्हा आपला प्रत्येक प्रतिसाद आपल्याला मैत्रीचे सत्य, त्याची अमर्यादता तसेच त्याच्या मर्यादांकडे पाहण्यास भाग पाडत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सत्य आपल्यासाठी व्यक्ती म्हणून आणि संपूर्ण समाजासाठी महत्त्वाचे असते. व्यक्ती म्हणून, सत्यवादी असण्याचा अर्थ असा आहे, की आपण आपल्या चुकांमधून शिकून मोठे आणि समंजस होऊ शकतो. समाजासाठी, सत्यता ही नेहमीच सामाजिक बंधने बनवत असते. खोटे बोलणे आणि दांभिकता असत्यतेमुळे आपली आपापसातील नाती तोडत असते. सत्य सांगणे महत्वाचे असते कारण ते प्रत्येकाला समजण्यास, पचवण्यास, मान्य करण्यास मदत करत असते. जेव्हा आपण आपल्या भावना योग्य प्रकारे व्यक्त करायच्या आणि त्या इतर व्यक्तींसोबत कशा शेअर करायच्या हे शिकतो, तेव्हा त्यामुळे त्या व्यक्तींबरोबर आपले जवळचे नाते निर्माण होत असते.



आधुनिक केसरी

## लाभला प्रसाद | धन्य झालो ||

केले जागरण | हरिच्या नामाचे ||
किर्तन कर्माचे | सांगे जीव ||१||

घालूनी गोंधळ | विकार मारला ||
स्वधर्म जागला | हरिकृपे ||२||

मागलिया काळ | निद्रे घात झाला ||
म्हणोनी पोसला | अहंकार ||३||

पूर्व संचिताने | झालो मी सावध ||
मनीचा उन्माद | शांत झाला ||४||

जागराचे पुण्य | आत्म्याशी संवाद ||
लाभला प्रसाद | धन्य झालो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरुपण”

आधुनिक केसरी

“निरुपण” या सदरात आजपासून आम्ही भगवान आदि शंकराचार्यविरचित श्रीदेव्यपराधक्षमापनस्तोत्राचे सार्थ निरुपण आधुनिक केसरीच्या वाचकांसाठी प्रकाशित करत आहोत.

**|| अथ श्रीदेव्यपराधक्षमापनस्तोत्रम् ||**

श्रीगणेशाय नमः |

श्रीदेव्यपराधक्षमापनस्तोत्र हे एक नितांत सुंदर असे स्तोत्र आहे. या स्तोत्रात आदि शंकराचार्यांनी अत्यंत विनम्रभावनेने जगदंबेला आळविले आहे. मातेची प्रार्थना केली आहे.

**न मन्त्रं नो यन्त्रं तदपि च न जाने स्तुतिमहो**
**न चाह्वानं ध्यानं तदपि च न जाने स्तुतिकथाः।**
**न जाने मुद्रास्ते तदपि च न जाने विलपनं**
**परं जाने मातस्त्वदनुसरणं क्लेशहरणम् ॥१॥**

आई ! मला कोणताही मंत्र माहित नाही, यंत्र माहित नाही. मला स्तुतीही माहित नाही, आवाहन माहित नाही. मला ध्यानाची माहिती नाही आणि मला स्तोत्र, कथा देखील माहित नाही. मला तुझ्या मुद्राही माहित नाही. आणि मला व्याकूळ होऊन विलाप करणेही जमत नाही. पण आई, मी फक्त इतकेच जाणतो की, मला तुझे अनुसरण करायचे आहे., जे सर्व क्लेश, दुःख आणि आपत्तींचे हरण करणारे आहे. || १ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# || दासबोध स्तवन ||



## "नैमिषारण्याचं महत्त्व"

आधुनिक केसरी

**||भागवत कथा||**

वेद, पुराणाच्या बाजूने विचार केला तर हे '"नाभी गया"आहे. येथेच जर तुम्ही भागवताचं पारायण केलं तर आपल्या पूर्वजांना मोक्ष गती प्राप्त होते. असे आपल्या पुराणात म्हटले आहे. ही भूमी 88'000 ऋषींच्या पवित्र स्पर्शाने पावन झालेली तपोभूमी आहे. महर्षि नारद व व्यासांनी 4 वेदांचे, 18 पुराणांचे, 6शास्त्रांची रचना या पवित्र भूमित केली. आपण श्रावण, लग्न, मुंजीत आणि वास्तू शांतीचे वेळीसत्यनारायण करतो त्या सत्यनारायणाच्या व्रत कथेचे उगमस्थान हे नैमिशारण्य आहे. त्रेता युगात प्रत्यक्ष हनुमान अहिरावणाचा वध करण्यासाठी प्रगट झाले. ते हनुमान गढी या नावाने ओळखले जाते. 110फुट भव्यदिव्य अशी हनुमंताची स्वयंभू मुर्ती चे दर्शन घेतले की आपल्याला नवचैतन्य मिळते यात शंकाच नाही. या पवित्र भूमीवर 33 कोटी देव देवता साडेतीन करोड तिर्थ,88हजार ऋषी नित्य निवास करतात अशी भक्तांची श्रद्धा आहे. महर्षी वेद व्यासांनी भागवत सांगितले व प्रत्यक्ष गणपतीने ते लिहिले ही अतिशय पवित्र वास्तु "व्यासगद्दी "या नावाने प्रसिद्ध आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

"सत्य परम धिमही "

अशी प्रचिती देणारं हे स्थान आहे.

या पुण्यभूमीवर भागवत कथेचे भागवताचार्य श्री महामहोपाध्याय मकरंदबुवा रामदासजी यांच्या अतिशय पवित्र वाणीने भागवत श्रवणाचे भाग्य मला लाभले. ओघवत्या भाषेत समोरच्याला सकाळी तीन तास व दुपारच्या सत्रात तीन तास अक्षरशः खिळवून ठेवणे हे ये-या गबाळ्याचे काम नाही. मकरंदजी तुम्ही निरूपणाला व्यासपीठावर बसल्यावर प्रत्यक्ष रामदास स्वामी तुमच्या तोंडून बोलत आहेत असा भास होत होता. ऊत्तम वक्तृत्व शैली कुठल्याही शब्दाचे पून्हा रिपिटेशन नाही। ह्दयाचा ठाव घेणारी भाषाशैली हे आणि अजून बरंच काही रामदासजी तुमचे वर्णन करायला शब्द अपूरे पडावेत अशा रसाळवाणीने मी तर भागवत कथा प्रथमच् ऐकत होते. धन्यवाद स्वामीजी **(क्रमशः)**

# शिवालयाला अर्धीच प्रदक्षिणा का घालावी ?

आधुनिक केसरी

जिथे शिवलिंगाची स्थापना केली आहे अशा शिवालयात संपूर्ण गोल प्रदक्षिणा घालायची नसते, हा असा नियम आहे. पण हे असं का? आपण शिवालयात गेलो. पिंडीला नमस्कार केला, अभिषेक घातला, कुठलं स्तोत्र पुटपुटलं, जी कुठली आपल्याला आराधना करायची होती ती केली. मग डाव्या हाताने परिक्रमा घालायला सुरुवात केली पण ही परिक्रमा अर्धीच घातली आणि आल्या मार्गाने तसेच परत फिरलो.

शंकराच्या बहुतेक मंदिरांमध्ये लोकांनी पूर्ण गोल प्रदक्षिणा घालू नये म्हणून परिक्रमा मार्ग मध्येच बंद केलेला असतो.

शिवलिंगाची अर्धी परिक्रमा घालण्याचा धर्माचा आदेश आहे. आपला धर्म विनाकारण आदेश देत नाही त्यामागे काहीतरी कारण असतं आणि त्याही आधी आपलं म्हणजेच भक्ताचं हित त्यात सामावलेलं असतं. शिवलिंगावर अभिषेक घातला की तो अभिषेक जिथून बाहेर पडतो, त्याला निर्मली किंवा जलधारी किंवा सोमसूत्र असं म्हणतात. त्या सोमसूत्रात काय असतं ? तर तिथे ऊर्जा असते आणि ही ऊर्जा अतिशय गरम आणि शक्तिशाली असते.

शिवलिंग हे शिव आणि शक्ती यांचं प्रतिक आहे. त्या पिंडीला शाळुंकेने धरून ठेवलं आहे. शाळुंका म्हणजे शक्ती, जी



अतिशय शक्तिशाली असते आणि जल, दूध किंवा ज्याने अभिषेक घातला आहे, तो अभिषेक जलधारीतून बाहेर पडताना ती ऊर्जा त्यात मिसळून जाते. ही ऊर्जा मानवाच्या शरीरासाठी चांगली नाही. आपण ते सोमसूत्र पायाने ओलांडलं की ही ऊर्जा आपल्या शरीरात प्रवेश करते आणि त्याचा परिणाम आपल्या शरीरावर व मनावर होतो.

याचा एक श्लोक आहे -

"अर्द्ध सोमसूत्रांतमित्यर्थः शिव प्रदक्षिणीकुर्वन सोमसूत्र न लंघयेत ।। इति वाचनान्तरात।"

आता हा दोष कुठला आहे, जो सोमसूत्र ओलांडल्याने लागतो ! शरीरावर असा काय परिणाम होतो ? सोमसूत्र ओलांडल्याने वीर्य निर्मितीवर प्रतिकूल परिणाम होतो. आपल्या शरीरातील पाच प्रकारच्या वायूंवरही याचा वाईट परिणाम होतो. आपण जांभई देतो, ही कृती देवदत्त वायुमुळे होते तसेच धनंजय वायू, हा वायू आपल्या संपूर्ण शरीरात इकडून तिकडे फिरत असतो, शरीराचे सगळे अवयव नीट काम करावेत या प्रयत्नात हा वायू असतो आणि मृत्युनंतरही हा वायू आपल्या शरीरात त्याचं अस्तित्व राखून असतो; या दोन वायूंच्या प्रवाहात सोमसूत्र ओलांडल्याने अडथळा निर्माण होतो. याचा परिणाम आपल्या शरीरावर आणि मनावरही होतो. म्हणून शिवलिंगाची संपूर्ण प्रदक्षिणा घालायची नाही आणि निर्मली आली की परत फिरायचं. हा नियम आहे. पण, सोमसूत्रावर जर गवत, पानं, दगड, विटा, लाकूड असं काही ठेवून ती निर्मली झाकून ठेवली असेल तर सोमसूत्र ओलांडण्याचा दोष लागत नाही. पण तरीही ‘शिवस्यार्ध प्रदक्षिणा’ हे म्हटलेलं आहे म्हणजेच शिवाची प्रदक्षिणा ही नेहमी अर्धीच घालावी.

सध्या श्रावण सुरू सुरू असल्याने शिवालयात गर्दी होत आहे. आपण शिवाच्या ज्या पिंडीचं म्हणजेच शिवलिंगाचं दर्शन घेत आहोत त्याचा अर्थ काय आणि या पिंडीला संपूर्ण प्रदक्षिणा घालायची नाही पण याचं कारण काय, हे सांगण्यासाठी हा दोन लेखांचा खटाटोप.



# स्वामींच्या जयघोषात न्हाऊन निघाले शिऊर

## शोभायात्रा, रथ मिरवणुकीने वेधले लक्ष; अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**शिऊर :** टाळ -मृदुंगाचा जयघोष, लेझीम पथकाचे देखणे सादरीकरण, वारकऱ्यांच्या वेशभूषा परिधान केलेले बालक, टाळाच्या ठेक्यावर ताल धरणारा अश्व, घरोघरी उभारलेल्या गुढ्या, प्रदक्षिणा मार्गावर रांगोळीची आरास, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन भजनात तल्लीन झालेल्या महिला, मंगलवाद्याचा मंगल सूर या मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात श्री संत शंकरस्वामींचा जयघोष... हे सर्व डोळ्याचे पारणे फेडणारे चित्र होते वैजापूर तालुक्यातील शिऊर या गावचे. श्री संत तुकाराम महाराज यांचे शिष्य संत निळोबाराय व संत निळोबारायांचे शिष्य श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाला २७६ वर्षाची अखंड परंपरा लाभली असून यावर्षीचा २७७ वा अखंड हरिनाम सप्ताह संतभूमी शिऊर येथे भक्तीभावात संपन्न होत आहे. मंगळवार दि.२ पासून या सप्ताहास कलशपूजनाने प्रारंभ झाला असून श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या रथाची शिऊर गावातून भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आबालवृद्ध सहभागी झाले होते. डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन महिलांवर्ग देखील भक्तीनामात तल्लीन झाल्या होत्या तर स्थानिक लोकप्रतिनिधीनीही फुगडीवर ठेका धरला. डोक्यावर कलश घेऊन मराठमोळ्या पेहरावात विद्यार्थिनी या शोभायात्रेत सहभागी झाल्या. फटाक्यांची आतषबाजी करत या मिरवणुकीचा समारोप सप्ताह स्थळी झाला. दरम्यान या सप्ताहामध्ये राज्यातील नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. दि. ९ रोजी संस्थानचे उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाचा समारोप होईल.

**रांगोळीतुन रेखाटले श्री संत शंकरस्वामी महाराज**

फिरता अखंड हरिनाम सप्ताहाचे औचित्य साधत खरज येथील लक्ष्मी व बालिशा कुंदे यांनी श्री संत शंकरस्वामी महाराजांची प्रतिमा हुबेहूब साकारली, तर प्रकाश घोडके सप्ताहस्थळी या रांगोळीची चर्चा आहे.

**डोळ्यांचे पारणे फेडणारी रोषणाई**

श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिरासह संपूर्ण बाजारतळ परिसरात करण्यात आलेली नेत्रदीपक विद्युत रोषणाई डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली आहे. खंडोबा मंदिर ते संत बहिणाबाई महाराज मंदिरापर्यत रस्त्याच्या दुतर्फा विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

**समाधीवर फुलांची आरास, सजावटीने प्रसन्न वातावरण**

हा सप्ताह फिरता नारळी असतो, दरवर्षी पंचक्रोशीतील गावात हा सप्ताह संपन्न होतो. यावर्षी हा सप्ताह स्वामींची समाधीस्थान असलेल्या शिऊर क्षेत्रात होत असून या सप्ताहाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शिवाय कोरोनाच्या काळानंतर व्यापक प्रमाणात हा सप्ताह होत असल्याने भाविकांचा मोठा ओघ असणार आहे. स्वामींच्या समाधीला आकर्षक फुलांची आरास व सजावट करण्यात आली असून महाद्वाराला लावलेले तोरण भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

**भव्य कीर्तन मंडप**

या सप्ताहाला विशेष आकर्षण भव्य कीर्तन मंडप ठरला आहे. तब्बल तेवीस हजार स्क्वेअर फूट जागेवर हा मंडप असून यात विविध रंगसंगतीने आकर्षक सजावट केली आहे तर भव्य व्यासपीठावरून ज्ञानदान होत आहे.

**लोकप्रतिनिधीसह ग्रामस्थ सहभागी**

या सप्ताह प्रारंभ मिरवणूकित लोकप्रतिनिधीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव, उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे, सचिव बबनराव जाधव, सप्ताह समितीचे उपाध्यक्ष सुनील पैठणपगारे, सुभाषचंद्र जाधव, माजी सरपंच सीताराम राऊत, चंद्रशेखर खांडगौरे, अशोक जाधव, निलेश देशमुख, नितीन चुडीवाल, संत शिवाई संस्थानचे अध्यक्ष पंढरीनाथ महाराज पगार, सरपंच राजश्री जाधव, ग्रामपंचायत सदस्य बाळा जाधव, विश्वस्त मंडळाचे पोपटराव जाधव, शिवाजी साळुंके, अनिल भोसले, मधुकर पवार, वाल्मिक भावसार, शिवाजी जाधव, सुनील देशमुख, बाळू पवार, राजेंद्र वरपे, दिलीप जाधव, भाऊसाहेब हारदे, मच्छीन्द्र जाधव, मिनीनाथ जाधव, काशिनाथ जाधव, उमाकांत एकबोटे, हरिभाऊ घोडके, शिरीष चव्हाण, सुशील देशमुख, आसाराम जाधव, अण्णा सुर्यवंशी, योगेश शेळके आदींसह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# महामार्गाच्या एका चुकीमुळे संपले पाच जणांचे जीवन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शिंदखेडा गावानजिक गव्हाणे फाट्याजवळ रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरु असताना तेथे निष्काळजीपणे उभ्या असलेल्या ट्रॅक्टरवर शिरपूरहून येणारी कार आदळल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात ५ जण ठार झाले आहेत. काल सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास झालेल्या अपघातात एका दाम्पत्यासह एका मुलीचा मुलगी तसेच चोपडा व सोनगीर येथील एकाचा समावेश आहे. याप्रकरणी नरडाणा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गव्हाणे फाट्याजवळ रस्त्याचे खड्डे भरण्याचे काम सुरु आहे. हे काम सुरु असताना तेथे काल सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास ट्रॅक्टर चालक पांडुरंग धोंडू माळी यांनी सदर ठिकाणी रस्त्यावरच निष्काळजीपणे ट्रॅक्टर उभे केले. त्यामुळे शिरपूरहुन नाशिककडे येणारी कार (एमएच ०२ डीएस १२७७) ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला जोरात धडकली. यामुळे कारमधील चालक संदीप शिवाजी चव्हाण, पत्नी मीना संदीप चव्हाण, मुलगी जान्हवी उर्फ परी संदीप चव्हाण या तिघांचा मृत्यू झाला. अपघातानंतर जान्हवीवर उपचार सुरु होते परंतु, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. हे दाम्पत्य नाशिक येथील उत्तम नगरातील रहिवासी आहेत. तसेच कारमधील हितेश अरुण चौधरी रा. म्हसरुळ, नाशिक यांचाही जागीच मृत्यू झाला. अपघातावेळी ट्रॅक्टर चालक पांडूरंग धोंडू माळी हे ट्रॅक्टरच्या मागे उभे असल्याने कार त्यांच्या अंगावरून चालून गेल्याने तेही जागीच ठार झाले. दरम्यान, मयत संदीप चव्हाण हे कारमधून आपल्या कुटूंबासह कानुमातेच्या उत्सवासाठी शिरपूर येथे आले होते. कार्यक्रम आटोपून येत असताना हा अपघात झाला. अपघातानंतर नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली होती. याप्रकरणी नरडाणा पोलिस ठाण्यात मयत ट्रॅक्टर चालक पांडूरंग माळी याच्याविरुध्द भादंवि कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८, २८३ मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिंदे गटाच्या आमदार-खासदारांमध्ये दोन गट : आदित्य ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापुर :** कोल्हापुरातील बंडखोर आमदार-खासदारांच्या मतदारसंघात भर पावसात आदीत ठाकरेंची तोफ धडाडली. शिवसेना नेते, युवासेना प्रमुख, आमदार आदित्य ठाकरे यांनी शिवसंवाद यात्रेच्या निमित्ताने कोल्हापुरातील शिवसैनिकांशी संवाद साधला. आदित्य ठाकरे यांनी शिरोळ येथे मेळावा घेत भर पावसात शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी गद्दारी केलेल्या ४० आमदार आणि १२ खासदार यांच्यातच दोन गट असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. दरम्यान, या दौऱ्यावेळी आदित्य ठाकरे यांनी नरसोबाची वाडी देवस्थानाचे दर्शन घेतले. आदित्य ठाकरे शिवसैनिकांशी संवाद साधताना म्हणाले, कोल्हापूरहून येताना अनेकांनी मला थांबवले, आपण मोठ्या संख्येने माझ्यासोबत आहात, आपला आशिर्वाद प्रेम पाहून हे पाहून मन भरून आले असे म्हणत गद्दारांना माफी नाही असे ठणकावून सांगितले. मला एवढच विचारायचं आहे जे काही घाणेरडं राजकारण सुरू आहे हे तुम्हाला पटणारे आहे का? ही गद्दारी तुम्हाला पटणारी आहे का? असे सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित शिवसैनिकांना केले. यांच्यावर विश्वास ठेवला ती आमची चूक झाली का? हे अपेक्षित नव्हतं यांना मिठीत घेताना, डोळे बंद असताना पाठीत खंजीर खुपसला, अशी खंत आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली.

# कन्नड येथे अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथे ठिकठिकाणी अण्णाभाऊ साठे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी युवा उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक शिवसेना शहरप्रमूख सुनिल पवार, शिवकुमार जैस्वाल, कैलास जाधव, पुंडलिक, प्रकाश शिरसे, अनिल आल्हाड़, जयंती अध्यक्ष विकी म्हस्के, मंगेश मावस, अमोल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी चिमुकल्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित भाषणे केली. तसेच संध्याकाळी पोलिस निरीक्षक राजीव तळेकर, शहरप्रमुख सुनिल पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली.

यावेळी मिरवणुकीत जयंती अध्यक्ष विशाल म्हस्के, उपाध्यक्ष अमोल इचके, कोषाध्यक्ष आकाश मावस, सचिव अनिल घाडगे, सदस्य योगेश घाडगे, मंगेश मावस, राजेंद्र घाडगे, अनिल घाडगे, कृष्णा जाधव, राजु घाडगे, दिपक तुपे, सुनिल घाडगे, दिपक घाडगे, शेषराव घाडगे, कृष्णा सोनवणे, गजानन साळवे, कचरू घाडगे, अमोल जाधव, कार्तिक सोनवणे, सुनिल इचके, सागर म्हस्के, शिवाजी जाधव, योगेश अंभोरे इत्यादी हजर होते.



# लक्षवेधक खेळाडू !

आधुनिक केसरी

बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून पुन्हा एकदा ईशान्येकडील खेळाडूंची कामगिरी लक्षणीय ठरत आहे. या वेळी मेरी कोम नाही; पण लवलिना बोरगोहेन, लालनिनरुंगा, मीराबाई चानू यांनी छाप पाडली आहे. या खेळाडूंची कामगिरी जशी लक्षवेधक आहे, तसाच या भागातील क्रीडा विकासदेखील नजरेत भरतो. प्रत्येक नव्या गोष्टीची सुरुवात ही शून्यातून होते. येथील क्रीडा आणि क्रीडा गुणवत्तेचा विकास हादेखील शून्यातूनच झाला. एक काळ असा होता की येथील दुर्गम भागामुळे सोयी-सुविधांचा अभाव तर होताच, पण खेळाडूदेखील तयार होत नव्हते. त्यामुळे मोठ्या सोडा पण, स्थानिक स्पर्धांच्या आयोजनातही अडथळे निर्माण होत होते. पण, १९९७ इम्फाळ आणि २००७ गुवाहाटी येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाने येथील चित्र बदलण्यास सुरवात झाली. हे चित्र इतक्या झपाट्याने बदलले की २०१६मध्ये गुवाहाटी आणि शिलॉंग शहरांची ‘सॅफ’ स्पर्धा आयोजित करण्यापर्यंत मजल मारली. पुढे ‘खेलो इंडिया’ युवा क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाने या भागाला जणू क्रीडा स्पर्धा आयोजनाचे प्रमुख केंद्र बनवले असे म्हणायला जागा आहे. ईशान्येकडील क्रीडा प्रसाराला वेग येण्यास केंद्र सरकार आणि देशातील क्रीडा व्यवस्थेवर लक्ष ठेवणाऱ्या क्रीडा प्राधिकरणाचा (साइ) मोठा वाटा आहे. योगायोग म्हणा किंवा केंद्र सरकारची विशेष नजर यामुळे येथील क्रीडा विक्रासाला चालना मिळाली. सर्वानंद सोनोवाल आणि नंतर किरेन रिजिजू हे या भागाचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय नेते क्रीडामंत्री म्हणून मिळाले. देशाच्या ‘अ‍ॅक्ट ईस्ट पॉलिसी’ या योजनेने खऱ्या अर्थाने या भागात क्रीडा क्षेत्राला दरवाजे उघडले गेले. सोनोवाल आणि रिजिजू या क्रीडा मंत्र्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनाची संधी ईशान्येकडच्या या छोट्या राज्यांना मिळाली. यात आयएसएल, वरिष्ठ बॉक्सिंग, क्रिकेट, १७ वर्षांखालील फुटबॉल विश्वचषक अशा अनेक स्पर्धांचे आयोजन येथे झाले आणि हा दुर्गम भाग क्रीडा क्षेत्रातील प्रमुख स्थान बनला. एक काळ हा भाग क्रीडा सुविधांपासून वंचित होता. त्यामुळे खेळाडू निर्माण होणे ही समस्या होती. क्रीडा मंत्रालय आणि ‘साइ’ या दोघांनी लक्ष घातल्यामुळे या भागाचा विकास झाला. खेलो इंडिया स्पर्धेने या विकासाला वेगळी चालना मिळाली. आयएसएलच्या माध्यमातून शिलॉंग लाजॉंग संघाच्या निर्मितीमुळे फुटबॉलचे येथील जाळे घट्ट विणले गेले. राणी लक्ष्मीबाई उपकेंद्र आसामला मिळाले. खेलो इंडियाच्या अनेक खेळांच्या अकादमी येथे स्थापित झाल्या. केंद्राच्या अर्थसंकल्पात कायम या भागाला गेली काही वर्षे झुकते माप मिळाले. पण, त्याचा फायदा त्यांनी उठवला. याचे फलित म्हणजे मणिपूरमध्ये आता आंतरराष्ट्रीय दर्जाचे राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ साकारत आहे. या सगळ्यात येथून नावारूपाला आलेल्या क्रीडा गुणवत्तेला विसरता येणार नाही. याची सुरुवात सिक्कीमचा फुटबॉलपटू बायचुंग भुतियापासून सुरू होते. पुढे त्याचा वारसदार सुनील छेत्री, बॉक्सर मेरी कोम, लवलिना, जिम्नॅस्ट दीपा कर्माकर, धावपटू हिमा दास, वेटलिफ्टिंगपटू मीराबाई चानू, जेरेमी लालनिनरुंगा या नव्या राष्ट्रकुल विजेत्यांपर्यंत येऊन थांबते. खेळात चमकले की सरकारकडून रोख पारितोषिके दिली जातात, सरकारी नोकरी मिळते. साहजिक या सर्वांमुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरळीत होऊ शकतो ही भावना खेळाडूंच्या मनात निर्माण झाली. घरची गरिबी दूर करण्यासाठी खेळाडूंना जणू एक मार्ग सापडला. त्यासाठी वाट्टेल तेवढी मेहनत घेण्याची त्यांची तयारी होती. आज स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत या भागातील खेळाडू देशाच्या पदकांमध्ये भर घालत आहेत.

# दिलीप धारूरकर : हाडाचा पत्रकार, निष्ठावान स्वयंसेवक आणि दिलदार मित्र



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**वैचारिक विमर्शाची लढाई आकार घेत असताना आणि दिलीपसारख्या अभ्यासू, ध्येयवादी शिलेदाराची आवश्यकता अधिक वाढलेली असताना दिलीप आम्हाला सोडून गेला आहे ! ६१ हे जाण्याचे वय नाही ! खरे तर त्याच्या आयुष्यातील पत्रकारिता आणि लेखनाचा कळस अध्याय होऊ घातलेला होता. पण नियतीला हे मान्य नव्हते. दिलीपने जाण्याचा मुहूर्त पण कसा साधला बघा ! आज १ ऑगस्ट लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी ! दिलीपची पत्रकार म्हणून दिलीप उमरगेकर नावाने कारकीर्द टिळकांच्याच केसरीच्या नगर आवृत्तीपासून सुरू झाली. त्यांच्यासारख्याच निर्भीड वृत्तीने दिलीपने पत्रकारिता केली. लोकमान्यांना संसारापेक्षा केसरी प्रिय होता आणि दिलीपने पण आयुष्यभर संसारपेक्षा आपल्या सामाजिक बांधिलकीला, पत्रकारितेला प्राधान्य दिले. सामाजिक संवेदनशीलता कधी-कधी माणसाच्या प्रकृतीवर परिणाम करून जाते. दिलीपच्या जाण्याने हे कटुसत्य अधिक जाणवत आहे.**

मित्रवर्य गिरीश वैकरने फोन करून विचारले 'दिलीप राव यांचे काही कळले का ?' मनात शंकेची पाल चुकचूकली, पण वेड्या आशावादी मनाने त्याची आणि माझी समजूत काढली. पण काही मिनिटातच बातमी नक्की झाली. दिलीप गेला ! पत्रकार जगतातील पत्रकार, संघ वर्तुळातील एक आदर्श स्वयंसेवक, सरकारी माहिती क्षेत्रातील धारूररकर साहेब आणि माझ्या सारख्यांचा अत्यंत जवळचा मित्र दिलीप आम्हाला सोडून गेला. १९८७ ते २०२२, असा आमचा ३५ वर्षाचा मैत्रीचा प्रवास ! सुरु झाला संघाच्या कामातून पण तो तेव्हढाच मर्यादित राहिला नाही. सुख दुःखाच्या गोष्टी, व्यक्तिगत जीवनातील व्यवहारिक निर्णय, नोकरी आणि व्यवसायातील उलथापालथी ते घरगुती नातेवाईक आशा सगळ्या विषयात आम्ही दोघे बरोबर होतो. मनातले बोलत होतो. त्यांची मुलगी ऋचाचे लग्न ठरल्यावर त्याचा फोन आला तेव्हा त्याच्यातला एक आनंदी समाधानी बाप बोलत असल्याचे जाणवत होते.

दिलीप प्रथम भेटला तेव्हाच त्याच्यात मराठवाड्याच्या मातीत असलेल्या जिव्हाळा आणि ममत्वाच्या गुणांचा परिचय झाला. वनवासी कल्याण आश्रमच्या कामात तो प्रथम जोडला गेला. अर्थात बालपणी संभाजीराव भिडे, सुरेशराव केतकर, बाळासाहेब दीक्षित आणि तरुण पणी माननीय मधुभाई आणि सोमनाथजी या प्रचारकांच्या सहवासात वाढल्याने प्रचारकांशी त्याची सहज मैत्री होत असे. त्यामुळेच सुनीलराव देशपांडे यांच्यामुळे संघाच्या नित्य कामाशी दिलीप जोडला गेला. पुढे विजयराव, शिरीषराव आणि चंदुभाऊ यांच्यामुळे दिलीपराव नगरच्या कामात स्थिरावले. सहज संवाद, मिश्किल आणि विनोदी स्वभाव आणि ऐसपैस वागणे त्यामुळे सगळ्या नगरच्या स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांत तो लवकरच लोकप्रिय झाला. वयोवृद्ध कै. आप्पा अंबिके यांच्यापासून ते एखादा बाल स्वयंसेवकाला पण दिलीप आपला वाटायचा. स्वर्गीय माणिकराव पाटील यांचा विशेष स्नेह त्यानी प्राप्त केला होता. अरुणराव धर्माधिकारी, कै शरदराव खांदाट, अशोकराव भोंग हे त्याची खास घरे.

स्वतःची प्रतिभा आणि बौद्धिक क्षमता त्याने कधीही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होऊ दिला नव्हता हे त्याचे वैशिट्य होते आणि त्यामुळेच लौकिक जगात कितीही मोठेपणा मिळाला तरी तो संघात वावरताना एक सामान्य स्वयंसेवक म्हणून वावरत असे. संघाच्या अधिकाऱ्यांनी त्याला एखाद्या लेखाबद्दल कौतुकाचे दोन शब्द बोलून पाठीवर थाप दिली की ते त्याला कुठल्याही सन्मानापेक्षा महत्वाचे असायचे. संघाचे प्रचारक, अधिकारी आणि बरोबरीचे कार्यकर्ते यांचे प्रेम, त्यांच्या सहवासातील आठवणी हीच त्याच्या जीवन जगण्याची प्रेरणा होती. आवर्जून तो जेव्हा फोनवर असे काही त्याचे झालेले कौतुक सांगायचा तेव्हा त्याची निरागसता आणि प्रांजळपणा खूप लोभस वाटायचा ! त्यात अहंकाराचा कुठे



लवलेश नसायचा.

तो हाडाचा पत्रकार होता हे शब्दशः खरे होते. त्याच्या घरातूनच ही प्रेरणा त्याला मिळाली होती. नगरला आल्यावर त्याला त्याची ही वृत्ती स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे केसरी मधून उमरगेकर या नावाने आणि इतर वृत्तपत्रात विविध नावाने त्याने लेखनास सुरुवात केली.

नगरमध्ये तरुण भारत सुरू होण्यासाठी त्याने प्रचंड मेहनत केली. शासकीय पगाराची चांगली नोकरी सोडून तरुण भारतची जबाबदारी स्वीकारली. अर्थात त्यात कुठलाही लाभ होण्यापेक्षा विचाराच्या प्रसाराची इच्छा, आकांक्षा होती. त्यासाठी त्याने काय काय केले, काय सहन केले यावर एक स्वतंत्र कथा कादंबरी होईल ! त्या काळातील सगळ्या कथा, उपकथा तो सांगायचा तेव्हा विनोदाने सांगता सांगता गंभीर होऊन जेव्हा त्याच्या डोळ्याच्या कडा ओल्या व्हायच्या तेव्हा मन गलबलायचे पण समजावून सांगणे आणि पुढील चांगले चित्र रंगवणे हेच करावे लागायचे.

नगरला पुणे विद्यापीठ संलग्न पत्रकारितेचा अभ्यासक्रम गोपळराव मिरीकर यांच्या साहाय्याने त्याने सुरू केला तेथे तो स्वतः शिकला, शिकवले आणि अनेक पत्रकार त्याने घडवले तेच आज नगरचे प्रमुख पत्रकार आहेत आणि दिलीपला गुरुस्थानी मानणारे आहेत. या क्षेत्रातील अफाट गुणवत्ता असूनही त्याने या गुणवत्तेचा उपयोग केवळ संघकार्य आणि त्या विचाराच्या प्रसारासाठीच केला हे येथे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

शेवटी जेंव्हा माहिती आयुक्त झाला तेव्हा आपला मित्र एव्हढा मोठा झाला याचे सर्वानाच कौतुक होते. अनेकजण त्याला त्या खुर्चीत बघण्यासाठी, त्याला मिळालेला मोठा बंगला बघण्यासाठी मुद्दाम जायचे. नागपूरला बैठकीला गेल्यावर मलाही हे सगळे त्याचे वैभव बघायला मिळाले पण यापेक्षाही जाणवले ते म्हणजे त्याने सिद्ध केलेली अफाट कार्यक्षमता ! माहिती आयुक्तांच्या कार्यालयात एकही धारिका (FILE) केस प्रलंबित अथवा शिल्लक नाही हे उदाहरण त्याने निर्माण केले. केवळ नागपूर नाही तर संभाजी नगरचा कारभार पण असाच हाताळून त्याने स्वतःला सिद्ध केले आणि मिळालेल्या संघ संस्काराचे सोने अधिक तेजोमय असे सिद्ध केले. हे काम करताना उघडपणे संघकार्य करता येत नाही याने तो अस्वस्थ असायचा.

या सगळ्यामुळे त्याच्या जीवन प्रवासात अस्थिरता निर्माण झाली पण त्याने त्यामुळे आपल्या वागण्यात, बोलण्यात नकारात्मकता, निराशा येऊ दिली नाही. त्याला जे वाटायचे ते काही मोजक्या मित्रांशी बोलायचा पण अन्यथा त्याने संयमातच खरा पुरुषार्थ असतो हे सिद्ध केले.

संघाबाहेर मोठा मित्रपरिवार त्याने नगर, संभाजीनगर, सोलापूर येथे जोडला होता. या रक्षाबंधनाच्या वेळी त्याने निर्माण केलेल्या मानलेल्या (रक्ताच्या नसलेल्या) अनेक भगिनी त्याचा आठवणीने अस्वस्थ होतील. त्याचा साधेपणा आणि निरपेक्ष वृत्ती अनेकांना अप्रूप वाटणारी होती आणि त्यांच्याबद्दलचा आदर वाढवणारी होती. माहिती आयुक्त असताना, पत्रकार, संपादक म्हणून काम करताना त्याने कुठलेही फायदे, लाभ पदरात पाडून घेतले नाही आणि कुणी तसे करताना त्याला सहन झाले नाही.

या सगळ्याचा प्रकृतीवर परिणाम होत असतो. तो त्याच्यावर पण झाला. मधुमेह, मग कोरोना त्यानंतर त्याचे इतर परिणाम आणि फुफ्फुसाचा त्रास याने तो पोखरला गेला आणि आज सर्वाना धक्का देत तो निघून गेला. त्याच्या बातमीने अनेकजण अस्वस्थ आहेत. अनेकांचे फोन आले. पण दिलीपसारखी व्यक्तित्व पार्थिव रूपाने गेली तरी त्यांच्या सहवासातून त्याने निर्माण केलेल्या आनंददायी आठवणीने सदैव आपल्यात असतात.

आता त्या नकला, किस्से, पोट धरून हसणे आणि रात्री जागवणे, थंडीत गरम दूध पीणे किंवा उन्हाळ्यात शिवशक्तीचे आईस्क्रीम किंवा सलार्ड (हा त्याचा खास शब्द) खाणे होणार ाही . त्याच्या हातचा भिशीभिली आण्णा हा खास कन्नड पदार्थ खायला मिळणार नाही याची जरूर खंत आहे पण स्वयंसेवकाच्या अभिव्यक्तीचे उदाहरण देत आमचा एक मित्र जगला याचा माझ्यासारख्या अनेकाना अभिमान आहे.

असे आज वाटते की स्वर्गीय दिलीप आद्य पत्रकार नारद महर्षी याना स्वर्गात लवकरच भेटेल आणि कदाचित तेथेही एखादे वृत्तपत्र सुरू करेल फक्त आम्हाला ते वाचायला मिळणार नाही एव्हढेच ! दिलीप धारूरकर याना विनम्र , भावपूर्ण श्रद्धांजली.

# तरच जगातून दहशतवादाचा नायनाट शक्य



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी


**अमेरिकेने लादेन, जवाहिरी यांच्या सारख्या दहशतवाद्यांना ढगात पाठवण्यासोबतच त्यांना पाठबळ देणाऱ्या देशांविरुद्ध देखील कडक धोरण स्विकारायला हवे. पाकिस्तान, अफगाणिस्तान हे देश कायम दहशतवाद्यांना प्रोत्साहन देत आले आहेत. पाकिस्तानने लादेनला तर अफगाणिस्तानने जवाहिरीला आश्रय दिला. म्हणजे हे देश दहशतवाद्यांना उघडपणे सहकार्य करत आहे. या देशांमुळेच जगात दशतवाद वाढत आहे. दहशतवाद्यांसोबतच दहशतवादाला आश्रय देणाऱ्या पाकिस्तान, अफगाणिस्तान सारख्या देशांविरुद्धही कडक भूमिका घेण्याची वेळ आली आहे. या देशांना जर जरब बसली तरच जगातून दहशतवादाचा नायनाट होईल.**

जगातील सर्वात मोठी आणि घातक दहशतवादी संघटना असलेल्या अल कायदा या संघटनेचा प्रमुख अल जवाहिरीचा खात्मा केल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी केली आहे. अल जवाहिरी हा जगातील सर्वात खतरनाक असा दहशतवादी होता. ओसामा बिन लादेन याच्या मृत्यूनंतर अल जवाहिरी हाच अल कायदाची सूत्रे सांभाळीत होता. अमेरिकेने अल जवाहिरीवर २५ दशलक्ष पौंडचे बक्षीस ठेवले होते. अमेरिकेवर झालेल्या ९/ ११ च्या हल्ल्यात त्याचा समावेश होता. या हल्ल्यात ३ हजारांहून अधिक निरपराध नागरिक ठार झाले होते. ओसामा बिन लादेनच्या मृत्यूनंतर अल जवाहिरीचा खात्मा करण्याचा अमेरिकेने अनेकदा प्रयत्न केला. अल जवाहिरी ठार झाल्याच्या बातम्याही अनेकदा आल्या पण त्या अफवा असल्याचे नंतर सिद्ध झाले. यावेळी मात्र स्वतः अमेरिकेच्या अध्यक्षांनी त्याच्या मृत्यूची घोषणा केली असल्याने ती खरी असण्याचीच शक्यता आहे. अर्थात ओसामा बिन लादेन याच्या मृत्यूनंतर त्याला कोठे दफन केले हे अमेरिकेने जगाला अद्याप कळू दिले नाही आताही अल जवाहिरीचा मृतदेह कोठे दफन केला जाईल हे जगाला समजणार नाही. ओसामा बिन लादेन याच्या मृत्यूनंतर आता अल जवाहिरी याचा देखील मृत्यू झाल्याने अल कायदाला मोठा झटका बसला आहे. ओसामा बिन लादेन याच्या मृत्यूनंतर अल कायदाला बसलेला हा मोठा धक्का आहे. अल जवाहिरी याला ठार करून अमेरिकेने दहशतवादा विरुद्धच्या लढाईत मोठा विजय मिळवला आहे. अल जवाहिरीच्या मृत्यूचे दूरगामी परिणाम होणार आहे. अल जवाहिरी याचा मृत्यू दहशतवाद विरुद्धच्या लढाईत एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे. कारण त्याच्या मृत्यूनंतर अल कायदाचे नेटवर्क कमकुवत होणार आहे. त्यांना आता नव्याने सुरवात करावी लागणार आहे. इतकेच नाही तर इतर दहशतवादी संघटनांना देखील मोठा इशारा मिळाला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे पाक पुरस्कृत दहशतवादी संघटनांनीही चाप बसणार आहे. ओसामा बिन लादेन हा पाकिस्तानमध्येच लपला होता. पाकिस्ताननेच त्याला आश्रय दिला होता आता अमेरिकेने अल जवाहिरी याला अफगाणिस्तानात जाऊन मारले आहे. अल जारहिरी हा अफगाणिस्तानातील काबूल येथे लपून बसला होता. अमेरिकेने ड्रोन विमानांचा वापर करून त्याला ठार केले. आता अमेरिकेच्या निशाण्यावर अन्य दहशतवादी संघटना आणि त्या संघटनांचे प्रमुख आहे. अल जवाहिरी याच्या मृत्यूने अमेरिकेत आनंद व्यक्त होत आहे अर्थात त्याला ठार करून अमेरिकेने मोठा विजय मिळवला असला तरी तो अंतिम नाही कारण अल कायदा आता नव्या म्होरक्यानिशी पुन्हा सक्रिय होईल त्यामुळे अमेरिकेला सजग राहावे लागेल. अमेरिकेने लादेन, जवाहिरी यांच्या सारख्या दहशतवाद्यांना ढगात पाठवण्यासोबतच त्यांना पाठबळ देणाऱ्या देशांविरुद्ध देखील कडक धोरण स्विकारायला हवे. पाकिस्तान, अफगाणिस्तान हे देश कायम दहशतवाद्यांना प्रोत्साहन देत आले आहेत. पाकिस्तानने लादेनला तर अफगाणिस्तानने जवाहिरीला आश्रय दिला. म्हणजे हे देश दहशतवाद्यांना उघडपणे सहकार्य करत आहे. या देशांमुळेच जगात दशतवाद वाढत आहे. दहशतवाद्यांसोबतच दहशतवादाला आश्रय देणाऱ्या पाकिस्तान, अफगाणिस्तान सारख्या देशांविरुद्धही कडक भूमिका घेण्याची वेळ आली आहे. या देशांना जर जरब बसली तरच जगातून दहशतवादाचा नायनाट होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अखेर संजय राऊत ईडीच्या फेऱ्यात अडकले



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**संजय राऊत काय आणि उद्या हसन मुश्रीफ, अनिल परब आत गेले काय याचे नवल वाटून घेऊ नका. स्वच्छता मोहीम चालू आहे. कोणी हुकूमशहा म्हणा कोणी हिटलर म्हणा पण नरेंद्र मोदी आणि अमित शाह घेतला वसा टाकणार नाहीत. भ्रष्टाचाऱ्यांना उघडे पाडणारच. जेलची हवा खायला घालणार. याचसाठी कॉंग्रेस संस्कृती संपवायला हवी. न खाऊंगा न खाणे दुंगा असे मोदी म्हणतात. पण कॉंग्रेस म्हणत असे एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ. तुम्हा खा आम्ही खातो, सगळेच खाऊ. या प्रथेला लगाम घालण्यासाठीच संजय राऊत सारखी माणसे योग्य जागी विसावली पाहीजेत हेच खरे.**

भारतीय राजकारण इंदिरा गांधींच्या कालखंडापासून भ्रष्ट झाले आहे. कर्ताच भ्रष्ट असला की त्याचे अवतीभोवती वावरणारेही निर्ढावले आणि इंदिरा गांधी यांनाच चूना लावायला शिकले. इंदिराजींच्या काळात रिझर्व बँकसुध्दा यातून सुटली नाही. नगरवाला प्रकरणात खूप मोठी रक्कम म्हणजे माझ्या स्मरणात असल्याप्रमाणे 76 कोटी रूपये साधारण 1975-77 दरम्यान खोटा फोन करून काढले आणि पुढे त्या रक्कमेचे काय झाले हे कोणालाच कळले नाही. प्रकरण दाबून टाकण्यात आले. नगरवाला जीवानिशी गेला. फक्रुद्दीन अली अहमदने इंदिराजींचे काही तरी ऐकले नाही, सही करायला नकार दिला. राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद त्यांच्याच घरात बाथरूममध्ये पाय घसरून पडल्याच्या निमित्ताने जीवानिशी गेले.

'इंदिरा इज इंडीया' म्हणनारे कर्नाटकचे नेते बारूआ गायब झाले. शास्त्रीजी ताश्कंदला कसे मृत पावले ते कोणालाच ज्ञात नाही. त्यावेळची रशियन राजवट, भारताचे परराष्ट्र मंत्री यशवंतराव चव्हाण, इंदिराजी यांनाच माहीत आणि आता हे कोणीच हयात नाहीत. हा बोकाळलेला भ्रष्टाचार या थराला गेला होता की पी. चिदंबरम् अर्थमंत्री असताना सरकारनेच डबल नोटा छापून व्यवहारात आणल्या, म्हणजे एबी सीरिजच्या चलनातील नोटा पून्हा छापून एकच सिरीज आणि एकाच नंबरच्या दोन नोटा मार्केटमध्ये फिरत होत्या. मग याचाच फायदा घेत पाकिस्तानने डुप्लिकेट नोटा छापून भारताचे व्यवहारात चलनात घुसवल्या. त्यांना सोपे जावे म्हणून की काय पाकिस्तान जेथून त्यांच्या नोटांसाठी कागद घेत होता तिथूनच सर्व नियम ढाब्यावर बसवून भारताने कागद खरेदी सुरू केली होती. छपायी यंत्रेही एकाच कंपनीकडून घेतली जात होती. खरेतर देशद्रोही गुन्हा आहे. परंतू या डुप्लिकेट आणि डबल चलनी नोटा बाहेर फेकण्यासाठीच नरेंद्र मोदींनी तातडीने नोटाबंदीचा धाडसी निर्णय घेऊन अंमलात आणला. कागद, मशिनस् सर्व बदल केले आणि भारतीय चलन सुरक्षित केले.

या नोटांचा सुळसुळाट झाला होता म्हणूनच काळे धन आणि व्यवहार वाढले होते. नोट बंदी नंतर दहशतवादाला खूप मोठा आळा बसला. आतंकवाद्यांना फंडस् मिळेनासे झाले. आशा वातावरणात वाढलेले, मोठे झालेले, नवशिके सगळेच निर्ढावलेले राजकारणी झाले. राजकीय नेते गेंड्यांच्या कातडीचे असतात ही संज्ञा यामुळेच प्रचलित झाली.




पत्रा चाळ घोटाळ्यात राऊत कुटूंब पुरते अडकले आहेत. 47 एकर जमिनीवर म्हाडाकडून जमीन घेऊन तेथील सर्व रहिवाश्यांना घरे बांधून देऊन उर्वरित एफएसआय यांनी डेव्हलप करून विकायचा ठरलेले असताना त्यापैकी 41 एकर जमीन एक हजार चौतीस का चवऱ्याहत्तर कोटी रुपयांना बेकायदा विक्री केली आणि एकाही तेथील निर्वासिताला घर बांधून दिलेच नाही. आणि जे राऊत छगन भुजबळ यांना ईडीने अटक केली होती तेंव्हा म्हणाले होते सरकारी इन्व्हेस्टिगेशन कंपन्या आपले काम प्रामाणिकपणे करत असतात यात राजकारण कोणी आणू नये. आणि आज ईडीने संजय राऊतांनाच अटक केली तर हे केंद्राचे षडयंत्र आहे. विरोधकांना शमवण्याचे कारस्थान आहे. शिवसेनेचा आवाज दाबण्याचा हा भाजपचा प्रयत्न आहे असे बरळत आहेत.

नवाब मलिक यांची मुलगी लगेच राऊतांना भेटायला गेली. कारण? संजय राऊत महापाताळयंत्री माणूस आहेत आणि त्यांचे ट्रेनर आहेत नारदमुनी. संजय राऊत यांचे घरी झाडाझडतीत रू. अकरा लाख पन्नास हजार रोकड सापडली आहे. पैकी दहा लाख रुपयांचे बंडल वेगळे होते आणि त्यावर शिंदे अयोध्या असे लिहिलेले होते म्हणे. म्हणजे जाणिवपूर्वक ही रक्कम लगेच सापडेल अशी ठेवलेली होती. आणि दिड लाख सर्वसामान्य माणसाचे घरातही असू शकतात. म्हणजे पत्रा चाळ घोटाळ्यात स्वतः अडकत असताना शिंदेंना अडकवण्याचा कट रचून जाणिवपूर्वक घरात कॅश सापडू दिली की काय असे वाटावे. ती कॅश जर एकनाथ शिंदेंनी दिली होती अयोध्या दौऱ्याचे खर्चासाठी तर मग ती शिंदेंनी कोठून आणली असा प्रश्न निर्माण होईल. पण शिंदे अयोध्या एवढ्या वरून एकनाथ शिंदेच असे कसे सिध्द होईल. ते संजय राऊतच जाणोत. पण त्या रकमेचा पत्राचाळीशी काय संबंध? चौकशी पत्रा चाळ व्यवहारातील गैर व्यवहाराची, तेथील रहीवाश्यांचे फसवणुकीची आहे. त्याबाबत चौकशीसाठी तीन दिवसाची ईडी कोठडी दिली आहे राऊतांना. नवाब मलिक यांनी आपले अनुभव आणि काही मौलिक सूचना तर दिल्या नाहीत ना कन्येमार्फत. आता खोलात जाऊन तीन चार दिवस कठोर चौकशी केल्या नंतरच सर्व चित्र स्पष्ट होईल.

रोजचा सकाळचा भोंगा बंद झाला, डोक्याचा ताप गेला ही एकनाथ शिंदे ची प्रतिक्रिया ते संजय राऊतच्या बडबडीला किती कंटाळलेत हे अधोरेखित करते. उध्दव ठाकरे वगळता बहूतेक सगळ्याच राजकीय नेत्यांना हायसे वाटत आहे, आनंद झाला आहे. पण आमचे साहेब यावर कांहीच बोलले नाहीत याचे नवल वाटते. पण साहेब परिस्थितीचा अंदाज घेतात, वेगळ्याच पैलूला पकडतात आणि नंतर अनाकलनीय मत नोंदवतात. जसे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी मुंबईबद्दल तद्यन सत्य बोलले तरी गदारोळ माजला. त्यात साहेबांनी प्रतिक्रिया देताना सांगितले त्यांचे डोक्यावरच्या टोपीचा रंग आणि त्यांचे मन सारखेच आहे. भगतसिंग कोश्यारी संघ स्वयंसेवक असल्याने संघाची काळी टोपी कायम वापरतात. तर त्यावरून मनही काळे आहे असे सांगून संघाला दोषी ठरवण्याचा इरादा स्पष्ट केला. तरी पण संजय राऊत काय आणि उद्या हसन मुश्रीफ, अनिल परब आत गेले काय याचे नवल वाटून घेऊ नका. स्वच्छता मोहीम चालू आहे. कोणी हुकूमशहा म्हणा कोणी हिटलर म्हणा पण नरेंद्र मोदी आणि अमित शाह घेतला वसा टाकणार नाहीत. भ्रष्टाचाऱ्यांना उघडे पाडणारच. जेलची हवा खायला घालणार. याचसाठी कॉंग्रेस संस्कृती संपवायला हवी. न खाऊंगा न खाणे दुंगा असे मोदी म्हणतात. पण कॉंग्रेस म्हणत असे एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ. तुम्हा खा आम्ही खातो, सगळेच खाऊ.

या प्रथेला लगाम घालण्यासाठीच संजय राऊत सारखी माणसे योग्य जागी विसावली पाहीजेत हेच खरे.

# सुधारणांचे दावे आणि शेतकरी आत्महत्या



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**शेतकरी आत्महत्यांच्या घटनांबाबत विविध आकडेवारी जाहीर करण्यात येते. सरकारी आणि गैर-सरकारी यांच्या आकडेवारीमध्येही बराच फरक येतो. पूर्वीसारखा आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय हा चर्चेचा विषय बनत नाही. दुसरीकडे केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांची स्थिती पूर्वीपेक्षा सुधारल्याचे सांगतात. आता ते दुर्लक्षित राहिलेले नाहीत, तर त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून त्यांना अनेक योजना आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचं सांगण्यात येतं. शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि कौटुंबिक समस्या सुधारल्या असतील तर मग शेतकरी आत्महत्या का करत आहेत, शेतकरी गरिबीत का जगतोय? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.**

महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, आसाम, ओडिशा, तेलंगणा या राज्यांमध्ये यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा खूपच जास्त पाऊस झाला आहे. शेकडो लोक यातले बहुतेक शेतकरी-मजूर आणि गरीब लोक वीज पडणे, घरे कोसळणे, झाडे पडणे आणि तलाव, नद्या आणि कालव्यात बुडणे यामुळे मरण पावले आहेत. कोट्यवधींच्या मालमत्तेचे आणि शेतीचे नुकसान झाले आहे. लाखो लोकांना आपली घरे सोडून सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला आहे. दुसरीकडे, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणामध्ये मात्र सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. अतिवृष्टी आणि अनावृष्टी (खूप जास्त पाऊस आणि सरासरीपेक्षा खूपच कमी पाऊस) या नैसर्गिक आपत्ती आहेत. त्यामुळे शेतकरी व मजुरांचा मृत्यू हा निसर्गाचा कहर मानता येईल. परंतु दरवर्षी देशातील हजारो शेतकरी, मजूर पीक-बागायतीसाठी व इतर गरजांसाठी घेतलेले कर्ज फेडण्यास असमर्थ ठरतात, पिकांचे व फळांचे नुकसान होणे, खर्च जास्त आणि पिकातून मिळणारे उत्पन्न कमी मिळणे, कुटुंबातील सदस्यांच्या आजारपणाच्या उपचारासाठी सावकारांकडून उचललेले कर्ज फेडणे शक्य न झाल्याने आणि त्यातून सावकारांकडून शेतकऱ्यांवर होणारे अत्याचार, दारिद्र्य, शेतकऱ्यांच्या मुलांच्या रोजगाराचा प्रश्न, घरगुती समस्या, शेतकऱ्यांच्या मुलांनी घेतलेले शैक्षणिक कर्ज न फेडणे, आणि त्यामुळे होणाऱ्या आत्महत्या या गोष्टी वर्षानुवर्षे तशाच कायम आहेत.

शेतकरी आत्महत्यांच्या घटनांबाबत विविध आकडेवारी जाहीर करण्यात येते. सरकारी आणि गैर-सरकारी यांच्या आकडेवारीमध्येही बराच फरक येतो. पूर्वीसारखा आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय हा चर्चेचा विषय बनत नाही. दुसरीकडे केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांची स्थिती पूर्वीपेक्षा सुधारल्याचे सांगतात. आता ते दुर्लक्षित राहिलेले नाहीत, तर त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून त्यांना अनेक योजना आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचं सांगण्यात येतं. शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि कौटुंबिक समस्या सुधारल्या असतील तर मग शेतकरी आत्महत्या का करत आहेत, शेतकरी गरिबीत का जगतोय? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. महाराष्ट्रातील विदर्भ, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, छत्तीसगड या राज्यांमध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या करतात. उदाहरणार्थ, 1990 च्या दशकात, स्टेट क्राइम रेकॉर्ड ब्युरोने दिलेल्या आकडेवारीनुसार, येथील शेतकरी एक व्यावसायिक श्रेणी म्हणून उच्च आत्महत्या दराच्या समस्येने त्रस्त आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न सर्वात गंभीर आहे. विदर्भात 3.4 दशलक्ष शेतकरी कापसाची लागवड करतात. यापैकी 95 टक्के शेतकरी कर्ज घेऊन कापूस पिकवतात. कापूस पिकवणारे विदर्भातील हे शेतकरी बियाणे, खते, वीज, पाणी आणि इतर गरजांसाठी बँक किंवा सावकारांकडून कर्ज घेतात. या भागातील शेतकऱ्यांचे वार्षिक सरासरी उत्पन्न 2700 रुपये प्रति एकर आहे.

गेल्या तीन दशकांत आत्महत्या केलेल्या लाखो शेतकऱ्यांमध्ये पंजाब आणि विदर्भातील शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्यापैकी आजही विदर्भातील शेतकरी सर्वाधिक आत्महत्या करत आहेत. गेल्या सहा महिन्यांत यंदा विदर्भातील 547 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण राष्ट्रीय आत्महत्येपेक्षा जास्त आहे.

खरे तर सिंचनासाठी पाणी आणि खतांची उपलब्धता हा आजही शेती आणि शेतकऱ्यांसमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे. सर्व प्रयत्नांनंतरही 60 टक्के शेती अजूनही निसर्गावर अवलंबून आहे. आकडेवारीनुसार, पावसावर आधारित शेतीमध्ये



सरासरी उत्पादन 1.2 टन प्रति हेक्टर आहे, तर बागायत क्षेत्रात ते सरासरी चार टन प्रति हेक्टर आहे. हेक्टरी चार टन उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला खत, पाणी, वीज, कीटकनाशके आणि खुरपणी-भांगलणी यावर जास्त खर्च येतो. पण त्याची किंमतही सरकारने ठरवून दिलेल्या किंवा बाजाराने ठरवून दिलेल्या किमतीतून वसूल होऊ शकत नाही. शेतकऱ्यांची मोठी अडचण ही आहे की सरकार दोन डझन पिकांची किमान आधारभूत किंमत (एमएसपी) जाहीर करते, पण ती खरेदी करण्यासाठी कोणतीही चोख व्यवस्था करत नाही. स्वातंत्र्य मिळाल्यापासून शेतकऱ्यांना कर्ज न मिळणे, खते, वीज, पाणी, उत्पादनांची किंमत अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मात्र गेल्या तीन दशकांपासून हवामान बदलाच्या परिणामांमुळे शेतीच्या नुकसानीत आणखी एका मोठ्या समस्येची भर पडली आहे. अनेक राज्यांमध्ये नीलगाय,हत्ती, रानडुकरे किंवा भटक्या जनावरांमुळे पिकांची नासाडी होण्याची समस्याही शेतकऱ्यांसमोर आली आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, भारतात दरवर्षी सरासरी 16 हजारपेक्षा जास्त शेतकरी आत्महत्या करतात. ज्यामध्ये 72 टक्के शेतकरी अल्पभूधारक असून ते बँकेच्या कर्जाने दबलेले आहेत. अनधिकृत आकडेवारी यापेक्षा कितीतरी पटीने अधिक दर्शवते. जेव्हा पीक तयार होऊन घरी येते तेव्हा त्याच्या भावात मोठी घसरण होते. अशा स्थितीत शेतकऱ्यासमोर उदरनिर्वाहाची आशा राहत नाही. उपासमारीने त्रस्त असलेल्या कुटुंबाला पाहण्यापेक्षा त्याने आपले जीवन संपवावे, असे त्याला वाटते. केंद्र आणि राज्य सरकारांना ग्राहक, मध्यस्थ आणि व्यापारी यांच्या हिताची तितकीच काळजी वाटत असली तरी अन्नदात्याच्या हिताचा त्यांना कसलाच कळवळा दिसत नाही. केंद्र सरकार विकसित देशांप्रमाणे भारतीय शेतीच्या विकासाच्या गप्पा मारत असले, तरी शेतकऱ्यांना अनुदान देण्याच्या बाबतीत मात्र ते एक पाऊल मागे घेते.

विकसित देशांमध्ये शेतकऱ्यांना हेक्टरी 2.10 लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. यामुळेच कोणत्याही विकसित देशातील शेतकऱ्याला गरिबीमुळे आत्महत्या करावी लागत नाही. प्रश्न असा आहे की, विकसित देशांतील शेतकऱ्यांप्रमाणे भारतातील शेतकऱ्यांची स्थिती सुधारेल का?

खेड्यांमधून शहरांकडे स्थलांतर वाढण्याची सर्व कारणे म्हणजे शेती नेहमीच तोट्यात असते आणि कुटुंब जगू शकत नाही. या स्थलांतराबाबत केंद्र सरकार आणि राज्य सरकार चिंता व्यक्त करतात, मात्र शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करताना त्याकडे लक्ष देण्याऐवजी फक्त आश्वासने देताना दिसतात. सामाजिक-आर्थिक जात जनगणना डेटा दर्शविते की आजही 75 टक्के शेतकरी कुटुंबांचे मासिक उत्पन्न 6 हजार रुपयांपेक्षा कमी आहे, तर केवळ 10 टक्के शेतकरी कुटुंबांचे उत्पन्न 10 हजार रुपये किंवा त्याहून अधिक आहे. जेव्हा पूर, दुष्काळ यांचा फटका पिकांना बसतो, तेव्हा एक टक्काही शेतकरी 5 हजार हजारांपर्यंत कमावत नाही. अशा स्थितीत शेतकऱ्यासमोर दोनच मार्ग उरतात. कुटुंबासमवेत वडिलोपार्जित शेती सोडून कुटुंबाला उपासमार होण्यापासून वाचवण्यासाठी त्यांनी शहरात जाऊन कारखान्यात काम करावे किंवा दुःखद प्रसंगाला सामोरे जाण्यापूर्वी या जगाचा निरोप घ्यावा. शेतकऱ्यांची स्थिती सुधारल्याशिवाय देशाची स्थिती सुधारणार आहे का, हा प्रश्न आहे.

# कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचे आत्मकथन : "हुमान"



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**संगिता धायगुडे यांचे "हुमान" हे आत्मकथन स्पर्धा परीक्षा देणाऱ्यां युवकांना प्रेरणा देणारे असेच आहे. त्यांनी एकदातरी ते जरुर वाचावे हे नक्कीच. हुमान म्हणजे कोडे. हे अनेक कोड्यांचे उत्तर आहे. अविनाश धर्माधिकारी म्हणतात "लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रे आत्मकथनाच्या मालिकेत बसेल असे "हुमान" आहे. तर ड़ॉ विजया वाड म्हणतात "हे पुस्तक एम.पी एस.सी.च्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचायला हवे.**

"हुमान" हे संगिता उत्तम धायगुडे ह्यांच आत्मकथन. संगिता उत्तम धायगुडे प्रशासनात आयुक्त पदावर कार्यरत होत्या. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील आंधळी हे संगिता धायगुडेंच खेड गाव. पुर्वाश्रमीच्या संगिता काळे. वडिल पोलिस पाटील होते. खेड्यातील प्रथेप्रमाणे प्रमाणें सोळाव्या वर्षीच पोलिस खात्यातील उत्तम धायगुडेंशी लग्न झाले. शिक्षणाची गोडी होती. बुध्दिमत्ताही होती. वाचन आणि शिक्षणाची आवड जोपासून पतीच्या सहकार्याने बारावी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. अनेक सांसारिक जबाबदाऱ्या, मुलाचे आजारपण स्वतःचे आजारपण असे अनेक प्रसंगाला सामोरे जावे लागले. सोळा-सतरा वर्षाच्या संसानंतर आजारपणात पतीचे निधन झाले. त्यानंतर आयुष्यात पोकळी निर्माण झाली. बी. ए. ची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊनही उदास वाटत होते. संपल्याचे विचार मनात येत. आत्महत्येचे विचार येतात. आत्महत्या करणार त्याच रात्री पतीची डायरी हातात पडते. त्यात पतीने लिहिलेले एक गाणे वाचण्यात येते.

**जमाना हँसे ऐसी भूल ना करना...**
**ये है बुझदिली तेरा बेमौत मरना...**
**यह मत भूल तू माँ है और पिता भी...**
**तेथे साथ मासूम दो जिंदगी भी...**
**तेथे बाद दुनिया मे इंनका क्या होगा..**
**कहाँ उनको जगमे सहारा मिलेगा..**
**उन्हीके लिए मुस्कुराके जिए जा..**
**बुराई के बदले भलाई किए जा...**

ह्या गाण्याने त्यांच्या जगण्याची दिशाच बदलून टाकली जाते. दोघे मुले डोळ्यासमोर येतात. ह्या आत्महत्येच्या प्रसंगातून सोडवण्यासाठीच जणू काही ते लिहून ठेवलेअसते. काहीतरी परमेश्वरी संकेतच म्हणावे.

आता काहीतरी करायचच. मागे फिरायचे नाही. एम.पी.एस.सी. करायचा निर्णय होतो. पण क्लास लावण खर्चाच्या आणि वेळेच्या दृष्टीने परवडणारे नसते. अनेकांना अनेक वर्ष क्लास लावूनसुद्धा पाच सहा वर्षात पोस्ट मिळत नाही. आपण तर किती वर्षे गृहिणी आहोत. बिना क्लासने टिकाव लागेल का? अनेकविध विचार येत. पण मनाचा निर्धार झाला होता. अनुकंपावरची नोकरी करुन अभ्यास करणे कसरतच होती. परिक्षेपूर्वी एक महिन्याची रजा टाकली. टाइम टेबल ठरवल.१८ ते २० तास अभ्यास करायलाच पाहिजे असा दंडक घालून घेतला. आता नैराश्याची जागा जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासानी घेतली. त्यांच्या ह्या प्रवासात दोन्ही मुलांनी त्यांना खूप मोलाची सहकार्य केल.

संगिता धायगुडे म्हणतात -

"कठोर मेहनतीनं मिळालेल फळ हेच अत्यंत सुंदर स्वप्न होय" हे प्रोत्साहन देणारे वाक्य भिंतीवर लावून ठेवले. कमी वेळात जास्त चांगला अभ्यास करण्यासाठी काही मेथड्स, क्लृप्त्या वापरु लागले. "स्वप्न ते नसतं जे तुम्ही झोपेत पाहाता, स्वप्न ते असतं जे तुम्हांला झोपू देत "नाही"ए.पी.जे.अ. कलामांच वाक्य वाचलं होत. त्याप्रमाणे महिनाभर तपश्चर्ये प्रमाणे अभ्यास केला.

पूर्व परीक्षा दिली. मुख्य परीक्षा दिली. प्रत्यक्ष मुलाखत. यशश्वी होऊन निवड झाली.

स्टडीसर्कल च्या अंकात मनोगत छापून आल. अनेकांनी त्यातून प्रेरणा घेतली. वाचून उत्साह वाढला.., जीवनाला नवी दिशा मिळाली..., तुमचे उदाहरण आम्हाला वंदनीय आहे...आपले आशिर्वाद हवे... असे असंख्य पत्र..प्रतिक्रिया आल्यात.

संगिता म्हणतात सिलेक्शन झाल्यावरही मला जेवढा आनंद झाला त्या पेक्षासुद्धा जास्त आनंद ह्या पत्रांनी दिला.




निवडीनंतर मुख्याधिकारी, उपआयुक्त, आयुक्त पदावर रायगड, ठाणे, खेड, मुंबई, नगर पालीका, महानगरपालिका, वसई-विरार, धुळे, मालेगांव, नासिक इ. ठिकाणी त्याची बदली झाली. नेमणूक केली गेली. शासनाच्या अनेक योजना, उपक्रम यशस्वीपणे राबविले. गरिबापर्यंत पोचविले. स्वच्छता अभियान, घनकचरा व्यवस्थापन, पाणी उपक्रम, वृक्षलागवड कार्यक्रम राबविले. प्रशिक्षणासाठी एक वर्ष जर्मनीत काढल. एक उत्कृष्ट प्रशासक, कर्तव्य दक्ष अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवला. प्रसंगी काही कठोरपणे, काही समझोत्याने निर्णय घेतले. कामकरण्याची वृत्ती, आणि प्रलोभना पासून दूर असल्याने आपल्या तत्वापासून कधी माघार घेतली नाही. लाच घ्यायची नाही आणि दबावा पुढे झुकायच नाही. ह्या व्रताशी त्या प्रामाणिक होत्या ज्या दिवशी माझ्यावर दबाव येईल, तडजोडीची वेळ येईल त्या दिवशी मी नोकरीचा राजीनामा देईल. असेही त्यांनी स्पष्टपणे आपले विचार मांडले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना महिला जीवनगौरव पुरस्कार, अहिल्यादेवी जीवनगौरव पुरस्कार,नवरत्न आई पुरस्कार, नागरी सेवा पुरस्कार, अशा अनेक पुरस्कारानी सन्मानित केले गेले. संगिता ह्या कविमनाच्या आहेत. "प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार" हा त्यांचा कविता संग्रह आहे.पँरडाइज हा कथासंग्रह, "स्वत्व "परिक्षा,हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे.

संगिता धायगुडे यांचे "हुमान" हे आत्मकथन स्पर्धा परीक्षा देणाऱ्यां युवकांना प्रेरणा देणारे असेच आहे. त्यांनी एकदातरी ते जरुर वाचावे हे नक्कीच. हुमान म्हणजे कोडे. हे अनेक कोड्यांचे उत्तर आहे. अविनाश धर्माधिकारी म्हणतात "लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रे आत्मकथनाच्या मालिकेत बसेल असे "हुमान" आहे. तर डॉ. विजया वाड म्हणतात "हे पुस्तक एम.पी एस.सी.च्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचायला हवे. ग्रंथाली प्रकाशनाने प्रकाशित ह्या पुस्तकाला डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांची प्रस्तावना आहे.. त्यात शेवटी त्यांनी म्हटले आहे...

**नियतीनं घातलं हुमान.**
**संगितान सोडवलं...**
**उंचावून मान.**

# हाडवैद्य असणारा हाडाचा सेवामुर्ती शिक्षक : संजय ताडेकर



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र. 8149498020

आधुनिक केसरी

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आरोग्य घडवता घडवता लोकांच्या हाडासंदर्भातील शारीरिक व्याधी दूर करून त्यांच्यामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम करणारा आणि स्वतःच आनंदी जीवन जगणारा समाजासाठी हाडवैद्य तर शिक्षणक्षेत्रासाठी हाडाचा शिक्षक म्हणून श्री. संजय तुकाराम ताडेकर सर यांचा उल्लेख करावा लागेल. महाभारतातील संजयप्रमाणे सरांना दूरची दृष्टी नसली तरी दूरदृष्टी मात्र हमखास असल्याने त्यांच्या शिक्षकी सेवाकाळ आनंददायी ठरला आहे.**

यावल येथील श्रीसाने गुरूजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक म्हणून आपल्या सेवेची सुरूवात करून त्यानंतर पर्यवेक्षक व सध्या उपमुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले संजय ताडेकर सर आपल्या सत्तावीस वर्षांच्या प्रदीर्घ शिक्षकी सेवेतून दि. 31 जुलै रोजी सेवानिवृत्त होत आहेत. संजय शब्दाचा अर्थ सक्षम, आधुनिक, आनंदी, लक्षपूर्वक, उदार सक्रिय, अनुकूल, भाग्यवान, गंभीर, सर्जनशील असा आहे. अगदी आपल्या नावाच्या अर्थाप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. शिक्षक असल्याने आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची तळमळ जोपासून त्यांच्या प्रती आपुलकीची भावना ठेवत अध्ययन-अध्यापन सातत्याने करत राहणे आणि आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य कसे घडेल या दृष्टीने कायम प्रयत्न करत राहणे, अशी भूमिका सरांनी आयुष्यभर ठेवली. गेल्या काही वर्षांपासून शिक्षणक्षेत्रात बदलाचे जोरदार वाहू लागले आहेत. या बदलाला सामोरे जावून नवनवीन संकल्पनांना सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे आणि अध्ययन-अध्यापन पद्धतीला नाविन्यपूर्ण उपक्रमांची जोड देवून आनंददायी अध्यापनाचे कार्य सरांनी केले. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला उत्साहीत करणे, त्यांच्या मनात कुतुहूल निर्माण करणे, विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांची, अडचणींची, शंकांची सोडवणूक करणे हे त्यांनी आयुष्यभर आपले आद्य कर्तव्य मानले. सतत चिंतन, मनन आणि लेखन यांचा विचार विद्यार्थ्यांमध्ये रूजवला. अध्यापन म्हणजे फक्त शिकविणे न राहता



स्वतःचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद घडवून आणला. त्यामुळे आजही विद्यार्थीप्रिय हाडाचा शिक्षक म्हणून त्यांची विद्यालयात ओळख कायम आहे.

शैक्षणिक क्षेत्रात आपली भूमिका निभावत असतानाच सामाजिक क्षेत्रातही सरांनी सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे. विविध संस्था व संघटनांच्या माध्यमातून आयोजित सामाजिक कार्यात ते हिरीरीने सहभागी होत असतात. समाजाचे आपण देणे लागतो या भावनेतून गरीब व वंचित घटकांसाठी मदत करण्यास सरांचा नेहमी पुढाकार असतो. त्याचप्रमाणे आपल्या वडिलांचा वारसा घेऊन पुढे वाटचाल करण्याचे सरांनी ठरवले आहे. सरांचे वडील श्री. तुकाराम ताडेकर हे फैजपूर येथील शिक्षक व एक सुप्रसिद्ध हाडवैद्य होते. हाडासंदर्भात कोणतीही शारीरिक व्याधी मोफत दूर करणे हे त्यांचे सेवाकार्य होते.

त्यांचाच वारसा सांभाळत संजय ताडेकर सर यांनी आपले हाडवैद्याचे सेवाकार्य अखंडितपणे सुरू ठेवले आहे. त्यामुळे आजही कोणतीच काळवेळ न पाहता हाडासंदर्भातील अनेक रुग्ण सरांच्या घरी आपल्या व्याधी दूर करण्यासाठी येतात. सांधेदुखी, हाड तुटणे, पाय लचकणे, चमक निघणे, पाठीचे दुखणे, हातपाय मोडणे अशा विविध दुखणे असलेल्या व्यक्ती सरांकडे नेहमी येतात. त्यामुळे हाडवैद्य शिक्षक म्हणून त्यांची ओळख भुसावळसह परिसरात आहे. अशा पद्धतीने हाडवैद्य असणारा हा हाडाचा आणि नेहमी आनंदी राहणारा शिक्षक इतरांसाठी प्रेरणादायी बनला आहे. जुने गाणे ऐकणे व म्हणण्याची आवड असणारे ताडेकर सर हे सदाबहार व्यक्तिमत्व आहे. मित्रांमध्ये वावरत असताना आपल्या अंगी असलेल्या विविध कौशल्यांचा नाविन्यपूर्ण उपयोग करून त्यांचे दर्शन मित्रांना ते करून देत असतात. त्यामुळे मित्रांमधील त्यांचे स्थान उल्लेखनीय ठरत असते.

संजय ताडेकर सर यांच्या पत्नी यावल तालुक्यातील सांगवी बुद्रुक येथील ज्योती विद्या मंदिरात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत तर दोन्ही मुले उच्चशिक्षित आहेत. अशा या समाजसेवा करणाऱ्या हाडाच्या हाडवैद्य शिक्षकाला सेवानिवृत्तीच्या खूप खूप शुभेच्छा. समाजसेवेसाठी सेवानिवृत्तीनंतरचे दीर्घायुष्य त्यांना निरोगी व आनंदी लाभो, हीच प्रभूचरणी प्रार्थना. त्यांची सेवापूर्ती होत असली तरी ही सेवामूर्ती आयुष्यभर समाजाची सेवा करत राहिल, हीच अपेक्षा.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) पाने ५३४ MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज पाने ३६४ MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# सबज्युनियर ग्रॅपलिंग स्पर्धेत जालना जिल्ह्याचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** 30 व 31 जुलै या दरम्यान आयोजित 2री महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर ग्रेपलिंग स्पर्धेच्या समारोप झाला. बक्षीस वितरण सोहळ्या दरम्यान तलवारबाजी खेळाचे राज्यसचिव शिवछत्रपती पुरस्कारार्थी डॉ.उदय डोंगरे यांच्या हस्ते पार पडला. समारोप प्रसंगी म्हणाले ग्रेपलिंग कुस्ती खेळाला महाराष्ट्रात अत्यंत चांगली प्रसिद्धी व चालना मिळाली आहे. यात ग्रॅपलिंग कमिटी ऑफ महाराष्ट्र राज्य संघटनेचे खूप मोठे योगदान आहे. या खेळाच्या विकासासाठी सर्वपरि योगदान देण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी ग्रॅपलिंग कमिटी ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रा. राकेश खैरनार, उपाध्यक्ष विकास गोसावी, प्रवीण शिंदे, सहसचिव प्रा.सागर मगरे सचिन आत्रे, कोषाध्यक्ष प्रतीक्षा नवगिरे, डॉ.भालचंद्र मोरे, संतोष आवचार, सुशील अंभोरे, अमिन शहा व सर्व पदाधिकारी हे उपस्थित होते. सर्व विजेत्या खेळाडूंना पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. या स्पर्धेत जालना जिल्ह्याने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले तर औरंगाबाद जिल्ह्याला त्या पाठोपाठ उपविजेते मिळाले. सामन्यासाठी पंच म्हणून राष्ट्रीय पंच सुरेश काकडे, प्रतीक्षा नवगिरे, सचिन जाधव, अविनाश वाडे, यांनी काम पाहिले.

तसेच राष्ट्रीय स्पर्धा उत्तराखंड राज्यातील देहरादून येथे 19 ऑगस्ट 21 ऑगस्ट रोजी होणार असून त्यात ग्रेपलिंग कमिटी ऑफ महाराष्ट्राचे ग्रॅपलिंग मल्ल सहभागी होणार आहे. संघांचे प्रशिक्षक कन्हैयालाल माळी( धुळे )तर संघ व्यवस्थापक म्हणून भगवान भुवर तर महिला प्रशिक्षक संघव्यवस्थापक म्हणून किरण पाटील मॅडम (जालना) यांची निवड करण्यात आली आहे.

15 वर्षाखालील 47 KG वजन गट : साईनाथ कुबेर (औरंगाबाद), आदित्य दराडे (जालना) तर रोहित डवणे, राम गोयल, केशव कुमार, प्रीतम कढरे (धुळे) यांनी आपापल्या गटात सुवर्णपदक पटकावले. ११ वर्षाखालील मुल गट : महेश रणपिसे (औरंगाबाद), प्रतीक माळी, पृथ्वीराज मोरे, राजपीर जाळे (जालना) यांनी आपापल्या गटात सुवर्णपदक पटकावले. ११ वर्षाखालील मुली मुलींमध्ये आराध्या भगवान कुबेर, अनुराधा शेळके, अभिलाषा गळवाटे, शिसा टाक, अश्विनी राऊत, भुवनेश्वरी पाटील, राजेश सोनवणे यांनी आपापल्या गटात सुवर्ण पदक पटकावले. तर १३ वर्षाच्या गट मुले स्वराज राठोड, श्याम रिगोल, अभिजीत गायकवाड, साई वडगुजर, शौर्य वाडेकर, प्रामाणिक पाटील, हार्दिक पाटील, निशांत जयरंग, रुपेश डाले, झलक भट, मुग्धा पाटील यांनी आपापल्या वजन गटात सुवर्णपदक पटकावले.



# किशोर चांडक यांनी पुरस्काराची रक्कम विद्यापीठास देणगी

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त विविध पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम विद्यापीठात संपन्न झाला. सोलापूरातील प्रमुख बांधकाम व्यावसायिक किशोर चांडक यांना यंदाचा जीवन गौरव पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

पुरस्कार प्रदान सोहळ्याला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.मृणालीनी फडणवीस तसेच डॉ.डी.टी.शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध इतर पुरस्काराच्या नंतर किशोर चांडक यांना ५१ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. किशोर चांडक यांना दिलेल्या ५१ हजार पुरस्काराच्या रकमेत त्यांनी स्वतःचे १ लाख रुपये घालून विद्यापीठाला १ लाख ५१ हजार रुपयांची देणगी म्हणून दिली. किशोर चांडक यांच्या औदार्याचे सर्व स्तरातून मोठं कौतुक करण्यात आले आहे.

# मातंग समाजाने परंपरागत कामे सोडून शिक्षणाकडे वळावे : भीमराव परघरमोल

आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** मातंग समाजाने परंमपरागत कामे सोडून शिक्षणाकडे वळून आपला स्वाभिमानपूर्ण विकास साधावा, असे प्रतिपादन व्याख्याता तथा अभ्यासक फुले शाहू आंबेडकरी विचारधारा तेल्हारा भिमराव परघरमोल यांनी २ ऑगष्ट रोजी ग्राम शिरसोली येथे अन्नाभाऊ साठे जयंती निमित्त झालेल्या कार्यक्रमात केले. तेल्हारा तालुक्यातील ग्राम शिरसोली येथे लहुजी सेनेच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांची १०२ जयंती साजरी करण्यात आली. त्यामुळे वेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय उगले हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून भिमराव परघरमोल, राजेश नृपणारायन, योगेश पोहरकार, प्रकाश बडगे, धम्मपाल दारोकार, राजू पाटील गावंडे यांची उपस्थिती होती. भिमराव परघरमोल आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांच्या रूपाने मातंग समाजाला महापुरुष मिळाले, त्यांनी आपला संपूर्ण उत्तरार्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चरणी समर्पित करताना म्हटले की 'जग बदल घालूनी, घाव मला सांगून गेले भीमराव' आणि जग जर बदलायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणामुळेच जग बदलता येते आणि स्वाभिमान जागृत होतो. असे ते म्हणाले. कार्यक्रमात राजेश नृपनारायण, धम्मपाल दारोकर, प्रकाश बडगे, योगेश पोहरकार, यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर भारसाकडे यांनी केले तर आभार संदीप बुंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लहुजी सेनेचे कार्यकर्ते सुनील दांडगे, अनिल दांडगे, मंगेश दांडगे, पंकज दांडगे, प्रकाश खंडारे, संदीप तायडे, बाबुलाल दांडगे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला गावातील सर्व जातीय बहुजन समाजाची उपस्थिती होती.

# माळीवाडा येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**माळीवाडा :** येथे आज दि.१ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०२ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी पंचायत समिती उपसभापती सर्जेराव चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य विजय जाधव, वनिता मुळे, ग्रामविकास अधिकारी जी.बी. हारदे, माजी उपसरपंच भिमराज बर्डे, ग्रा.प.सदस्य धम्मापाल, प्रविण बर्डे, कृष्णा मुळे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास मान्यवराचा हस्ते हार घालुन पुजन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनाचे भाषणे झाली. प्राध्यापक शिवाजी गायकवाड यांनी लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जिवनावर व्याख्यान दिले. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या परिसरात विद्युत रोशनाई केली. रांगोळी टाकून परीसर सजवला होता. यावेळी माजी पंचायत समिती उपसभापती सर्जेराव चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य कलिम पटेल, ज्ञानेश्वर गोल्हार, सुधाकर हेकडे, माजी सरपंच जगन्नाथ भगत, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मुळे, एकनाथ सिरसाठ, जि.प. शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर आधाने, जिल्हा काँग्रेस सरचिटणीस मयुर साठे, पत्रकार जावेद शेख, पत्रकार अभय विखनकर, आधुनिक केसरी प्रकाश लकडे, आसाराम साठे, ग्रा.प. सदस्य कमलबाई आस्वार, शिवाजी आस्वार, गणेश आस्वार, प्रदिप अस्वार, भागिनाथ आस्वार, आसाराम आस्वार, सतिष आस्वार, शुभम खंडागळे, बंडू आस्वार, रामभाऊ आस्वार, किशोर आस्वार, तसेच गावचे पोलीस पाटील प्रमोद साठे गावातील महिलांसह नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या राज्य संपर्क प्रमुखपदी सागरराज बोदगिरे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ राज्य संपर्क प्रमुखपदी सागरराज जगन्नाथ बोदगिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी याबाबचे अधिकृत पत्र दिले.

अखिल भारतीय पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय पत्रकार संघाच्या

पुणे शहर / जिल्हा संपर्क प्रमुख म्हणूनही ते काम पाहत आहेत. या कार्याची दाखल घेत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी राज्य संपर्क प्रमुखपदी सागरराज जगन्नाथ बोदगिरे यांची नेमणूक केली आहे. सागरराज बोदगिरे हे गेली १० वर्ष सिद्धांत मीडिया ॲण्ड पब्लिसिटी या माध्यमातून जनसंपर्क क्षेत्रातकाम करीत आहेत. तसेच वृत्तपत्र, डिजिटल या माध्यमात देखील ते कार्यरत आहेत.

संपर्क प्रमुख पदभार सांभाळल्यानंतर महाराष्ट्रातील शहर, ग्रामीण भागातील पत्रकारांना संस्थेशी जोडण्याचे आपले ध्येय असल्याचे सागरराज बोदगिरे यांनी सांगितले.

# अखेर ३५ दिवसांपासून मृत्यूशी झुंज देणाऱ्या सूरजची प्राणज्योत मावळली

आधुनिक केसरी न्यूज



**पुसद :** तालुक्यातील भोजला येथील संजय भोसले यांचा एकुलता एक मुलगा सुरज हा शेतातील झाडाच्या फांदी तुटल्याने खाली कोसळला होता. त्यात त्याला जबर मार लागल्याने नागपूर येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. गेल्या ३५ दिवसांपासून मृत्यूशी झुंज देणाऱ्या सुरजची अखेर प्राणज्योत मावळली.

सदरील ही घटना दि.२५ जून २०२२ रोजी घडली होती. शेतातील जांभुळनीच्या झाडावर गेला असताना त्या झाडाची फांदी तुटल्यामुळे खाली पडला होता. त्यावेळेस नातेवाईकांनी पुसद शहरातील मेडिकेअर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्याच्यावर नागपूर येथील डॉक्टरांनी एक शस्त्रक्रिया केली ती यशस्वी झाली. परंतु त्याच्या मानेतून शरीरातल्या सर्व अवयवांना रक्तपुरवठा आणि प्राणवायू पुरवणारी मुख्य नस अनेक जागी चाळणी झाल्याने त्याला श्वास घ्यायला प्रचंड त्रास होत होता. त्यावेळी डॉक्टरांनी त्याला कृत्रिम श्वास देऊन व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. या काळात कुटूंबियांच्या व नातेवाईकांच्या वतीने त्यावर उपचार होण्यासाठी देशातील अनेक नामांकित हॉस्पिटलला विचारणा केली पण ते शक्य झाले नाही नातेवाईकही हतबल झाले. नातेवाईकांच्या आशेवर पाणी फिरले तेव्हा १५ दिवसांपासून स्थानिक डॉक्टर रुग्णाला घरी घेऊन जाण्याचा सल्ला देत असतानासुद्धा भाबड्या आशेने गेल्या ३५ दिवस मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये सुरजला ठेवण्यात आले परंतु सुरजला पाठीला जख्मा झालेल्या असल्याने वेदना असह्य होत होत्या. हे न पाहावल्याने अखेर काल सायंकाळी दरम्यान ६.३० भोजला गावी नेण्याचा निर्णय नातेवाईकांनी घेतला. रुग्णवाहिका बोलाविण्यात आली व त्याला रुग्णालयातून घरी नेत असताना रस्त्यातच त्याची प्राणज्योत मालवली. सुस्वभावी तरूण सुरजच्या मृत्यूमुळे भोजला गावावर शोककळा पसरली.

# ‘हर घर तिरंगा’ झेंडा उपक्रमातंर्गत नागरिकांनी सहभागी व्हावे : प्रा.जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत "हर घर तिरंगा" हा उपक्रम सावळदबारा ग्रामपंचायत कार्यालयात राबविण्यात येणार आहे. नागरिकांना योग्य दरामध्ये झेंडा विकत घेता यावा यादृष्टीने जिल्हाभरात व सोयगाव तालुक्यात झेंडा विक्री केंद्र सुरु करण्यात येत असुन सावळदबारा ग्रामपंचायत कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या तिरंगा झेंडा विक्री केंद्राचा शुभारंभ सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आला. यावेळी ग्रामविकास अधिकारी सुधीर भालेराव, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, संजय राजपूत, संदीप सुर्यवंशी, शांताराम खराटे, ईशा तडवी, फकीराभाऊ तडवी, पत्रकार बंन्धू, सर्व ग्रामपंचायत सदस्य, शिक्षकवर्ग आदींची उपस्थिती होती. ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात सुरु करण्यात आलेले झेंडा विक्री केंद्र हे सुट्टीचे दिवस वगळता सकाळी १०.०० ते सायं. ६.०० या वेळेत सुरु राहणार असुन प्रती झेंडा ३० रुपये एवढी किंमती असणार आहे. सावळदबारा येथील नागरिकांनी दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत आपल्या घरावर तसेच प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या कार्यालयाच्या इमारतीवर तिरंगा फडकवून या महोत्सवात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविण्याचे आवाहन प्रा. जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) सावळदबारा ता.सोयगाव यांनी यावेळी केले.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# सोयगाव तालुक्यातील मोलखेडा येथे खुरपणीसाठी मजूर मिळेना

## शेतकरी हैराण; रिपरिप पाऊस थांबल्याने शेती कामांना आला वेग

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सावळदबारा :** सोयगाव तालुक्यातील मोलखेडा, हिवरी येथे चक्क एक आठवड्यानंतर पावसाने विश्रांती घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिल्याने शेती कामांना चांगलाच वेग आल्याचे चित्र सर्वत्र सावळदबारा परिसरात मोलखेडा हिवरी येथे पाहावयास मिळत आहे. मात्र खुरपणीसाठी वेळेवर मजुर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मजुरांची विनवणी करावी लागत आहे. मिरची तोडणी, खुरपणी, कोळपणी असे शेतकऱ्यांचे सर्व कामे एकत्र आल्याने शेतकऱ्यांची मोठी धावपळ होत आहे.

सोयगाव तालुक्यात मागील दिवसात काही आठवडे उलटूनही गेले तरी पावसाची रिपरिप सुरूच होती. परंतु आता पाच ते सहा दिवस झाले आहे की, वरुणराजे आता सध्या तरी सुट्टीवर असल्याने कामाला वेग आला आहे. त्यामुळे सतत पाऊस सुरू असल्याने शेतात तणाच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. आता पावसाने



उघडीप दिल्याने शेती कामांना वेग आला असून खुरपणी, कोळपणी, औषध फवारणी आदी कामे जोमाने सुरू असल्याचे चित्र सर्वत्र परिसरात पाहावयास मिळत आहे. यामध्ये कपाशी, सोयाबीन, मक्का, उडीद, मुंग, भुईमूग, तुर, आद्रक, मिरची या पिकांतील वाढलेले तन काढत आहे तसेच बैल औताने (कोळपणी) करण्याचे काम जोमात सुरू असल्याचे चित्र सर्वत्र पाहावयास मिळत आहे. तर कीटक नाशक औषधी फवारणीचे कामे सुरु आहेत.

### चांगल्या रोजगारामुळे मजूर मिरची तोडणीला

**सावळदबारा परिसरात हिरवी मिरचीची लागवड सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात झाली असून मिरची तोडणीला मजुर मिळतात पण शेतातील तण काढण्यासाठी व खुरपणीसाठी मजूर येत नाही. कारण मिरची तोडणी पासून मजुराला चांगला रोजगार मिळत असल्याने मजुर मिरची तोडणीसाठी जात असल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. अनेक शेतकरी जास्तीची मजूरी देऊन शेतातील खूरपणी, तणनाशक, कोळपणी करून घेत आहे.**

**अतुल इंगळे**
**ग्रा.प.सदस्य तथा शेतकरी मोलखेडा, हिवरी**



# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, संभाजीनगर तर्फे कलश मंगल कार्यालय येथे 10 वी, 12 वी, सीबीएससी, सीएससी, बोर्डमध्ये गुणवंत 70 विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी डॉ. महेश पाठक, डॉ. यामिनी गोटुरकर, संघटनेचे मराठवाडा सचिव सुरेश जोशी आदी प्रमुख पाहुणे होते.

अदिती पुंड, शार्दुल देशपांडे, निसर्ग देशपांडे, वैष्णवी रामदासी, पराग लिगदे, अर्षाती पुंड, गौरी कुलकर्णी, रेणुका जोशी, आर्या गोरे, मयूरी कुलकर्णी आदींसह सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुधीर नाईक पाहुण्यांचे स्वागत केले व प्रास्ताविक केले तसेच महिला जिल्हा अध्यक्ष सुचिता पलोदकर यांनी मान्यवरांचे आभार मानले. यावेळी 3 जुलैला जो वधु वर मेळावा घेतला होता. त्या पुस्तिकेचे प्रकाशन ही मान्यवर व सर्व पदाधिकारी यांचे हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात किरण शर्मा, गायत्री न्यायाधीश, प्राजक्ता तांबोळी, रश्मी ढापरे, सीमा नंदापूरकर, संजय टोणपे, धनंजय पलोदकर, मोहन काळे, दीपक कुलकर्णी, प्रकाश महाजन, सुभाष जोशी, कालीदास त्रिवेदी, अविनाश देशपांडे, कुणाल वैद्य, आकाश हर्सुलकर, चंद्रशेखर देशपांडे, सूरज कुलकर्णी, महेश काळे, महेश कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्नशील राहणार : विलास इंगळे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात नाविन्यपूर्ण व्यवसाय शिक्षण देणारी प्रथम क्रमांक संस्था महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास व प्रशिक्षण मंडळ मान्यता प्राप्त महालक्ष्मी माता बहुउद्देशीय संस्था शिरोडी संचलित ज्ञानदा कौशल्य विकास संस्था शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी या संस्थेने आय टी आय च्या माध्यमातून आतापर्यंत बरेच विद्यार्थी, स्वावलंबी बनवले. शासकीय सेवेत बरेच विद्यार्थी रुजू झालेत आणि यावर्षी ही यशाची परंपरा कायम ठेवली. सालाबादप्रमाणे यशाची परंपरा कायम असून डीप्लोमाकोर्सइन इलेक्ट्रिसियन 2020 ब्याच निकाल जाहीर झाला. DIPLOMA COURSE IN ELECTRICIAN सेंटर ज्ञानदा कौशल्य विकास संस्था कन्नड, (आय टी आय कॉलेज) 96% निकाल घेऊन घवघवीत यश मिळवले. म्हणुनच संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे, संस्थेच्या सचिव अमृता इंगळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून अभिनंदन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे, संस्थेच्या सचिव अमृता इंगळे, सचिन पिंपळे, स्वप्नील बनकर, बाळू गायकवाड, विशाल गायकवाड, शीतल पाटील यांनी ही विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





# ग्राम संसद देव्हारी नागरिकांसाठी भव्य महाआरोग्य शिबिर

## या शिबिराचा लाभ घ्यावा : प्रदीप चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** तालुक्यातील देव्हारी येथील परिसरात केसुला प्रतिष्ठाण नांदा तांडा व देव्हारी येथे जिल्हा परिषद शाळेत ग्रामपंचायत देव्हारी यांच्या संयुक्त विद्यमाने व सरपंच शामिर जिलानी तडवी, उपसरपंच मिराबाई उत्तम चव्हाण, ग्रामविकास अधिकारी सुरेश काळे, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण, माजी सरपंच मोहन चव्हाण यांनी मोफत भव्य महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून फर्दापूर पोलीस स्टेशनचे सपोनि देवीदास बाळासाहेब वाघमोडे यांची उपस्थिती राहणार आहे.

देव्हारी येथील आज दि.३ रोजी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. गरीब जनतेची रुग्णालयात होणारी पैशांची लुटमार याला आळा घालण्यासाठी व गरजू रुग्णांनी व इतर परिसरातील ग्रामस्थांनी या शिबिराचा उपक्रमांचा फायदा व्हावा यासाठी केसुला प्रतिष्ठानचे संस्थापक प्रदीप चव्हाण व मो.तालिब मो.शब्बीर (सामाजिक कार्यकर्ते) यांनी जळगाव येथील गोदावरी फाउंडेशनच्या अध्यक्षांची भेट घेऊन आमच्या देव्हारीमध्ये महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात यावे अशी विनंती केली असता गोदावरी फाउंडेशनच्या अध्यक्षांनी परवानगी दिली.

तरी पंचक्रोशीतील जनतेनी येणाऱ्या 3/8/22 बुधवार रोजी आरोग्य शिबीराचा लाभ मोफत स्वरूपात घ्यावा. यामध्ये 2D इको, E.C.G., कारडिओग्राफी, मधुमेह, रक्तदाब, मुतखडा, नेत्र तपासणी, हृदय विकार तपासणी इ. केली जाणार आहे. तरी पंचक्रोशीतील तमाम जनतेनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रदीप चव्हाण भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष व मो.तालिब मो.शब्बीर सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे.

# सोयगाव तालुक्यातील फर्दापूर जि. प. गट अनुसूचित जातीसाठी (सर्वसाधारण) राखीव

## फर्दापूर माजी पं.स. सदस्य विजय तायडेंना आ.अब्दुल सत्तारांकडून मिळू शकते उमेदवारी!

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** नुकतेच आगामी जि.प.,पं.स. निवडणुकीचे आरक्षण सोडत जाहीर झाल्याने या आरक्षण सोडतीत जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील



गोंदेगाव, आमखेडा, फर्दापुर हे तीनही जिल्हा परिषद गट आरक्षण सोडतीत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव झाल्याने गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या दिग्गज उमेदवाराचे पूर्णतः स्वप्न भंगले असून जिथे पंचायत समिती गण ओबीसी किंवा सर्वसाधारण असेल तिथे मात्र ते पाण्यावरच आपली तहान भागू शकतात अशी परिस्थिती सोयगाव तालुक्यात निर्माण झालेली पाहायला मिळत आहे. सोयगाव तालुक्यातील राजकीय समीकरणे याचा थोडक्यात घेतलेला आढावा व केलेले हे राजकीय विश्लेषण आहे.

सोयगाव तालुक्यात दिवंगत माजी मंत्री बाबुराव काळे यांच्या नावानेच हा तालुका ओळखला जातो. त्यांनी निर्माण केलेला हा तालुका त्यांच्या पश्चात सुद्धा आजपर्यंत उपेक्षित राहिलेला आहे. आजपर्यंत या तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, शोषित, पीडित, वंचित, आदिवासी आलूतेदार, बलुतेदार, लोकांचे जनजीवन शासकीय योजने पासून उपेक्षित राहिलेले आहे. या तालुक्याला खऱ्या अर्थाने आज एका राजकीय आणि सामाजिक विचार करणाऱ्या माणसाची गरज असून त्यांना न्याय देण्यासाठी निर्णय घेतला पाहिजे, अशा माणसाच्या शोधात सध्या सोयगाव तालुका असून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आता कोणाला निवडून द्यायचे हा विचार आरक्षण सोडत जाहीर झाल्यापासून सोयगाव तालुक्यातील सुज्ञ मतदार करत आहे. या तालुक्यातील आता नव्याने जाहीर झालेल्या जिल्हा परिषद गट निहाय उमेदवाराची राजकीय दृष्ट्या केलेली ही चाचपणी व राजकीय समीकरणे कशी असेल हे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.



### फर्दापुर जि.प.गट

सोयगाव तालुक्यातील फर्दापूर हा जिल्हा परिषद गट मोठा असून फर्दापुरचीच लोकसंख्या उमेदवाराला निवडून आणू शकते. या फर्दापुर गावामध्ये मुस्लिम मतदारांची संख्या अधिक असल्याने जिकडे हा मतदार कौल देईल तोच उमेदवार निवडून येईल अशी परिस्थिती फर्दापूर जिल्हा परिषद गटाची आहे. या फर्दापुर गावाचे माजी पंचायत समिती सदस्य विजय चिंतामण तायडे हे माजी मंत्री तथा सिल्लोड सोयगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार अब्दुल सत्तार यांचे विश्वासू मानले जातात. आरक्षण सोडत झाल्याने विजय तायडे यांच्यावर आतापासून मतदार अभिनंदनाचा वर्षाव करत आहे.विशेष म्हणजे त्यांच्या नावाची सध्या जोरदार चर्चा चालू असून मोठ्या प्रमाणात त्यांना त्यांच्या निकटवर्तीयांकडून अभिनंदनाचे फोन, मेसेज येणे सुरू झाले आहे. विजय तायडे हे सामाजिक कार्यकर्ते असून ते सोयगाव पंचायत समितीचे माजी सदस्य आहेत. त्यांनी त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवन प्रवासामध्ये अनेक समाज उपयोगी, सामाजिक कार्यक्रम घेऊन आमदार अब्दुल सत्तार यांची ताकद वाढवण्याचे काम त्यांनी आजपर्यंत केलेले आहे. गावातील विविध राजकीय पक्षांशी त्यांचे अत्यंत चांगले संबध असून नक्कीच त्यांना त्यांच्या स्वभावाचा फायदा होऊ शकतो.

विद्यमान आमदार अब्दुल सत्तार यांना फर्दापुर गावात मानणारा मोठा वर्ग असल्याने ते सांगेल तिच पुर्वदिशा ठरवली जाते. त्यामुळेच विजय तायडे यांना उमेदवारी दिल्यास ते प्रचंड मताधिक्याने निवडून येऊ शकतात असे वातावरण सध्या फर्दापुर जिल्हा परिषद गटात पाहायला मिळत आहे. अब्दुल सत्तार यांच्या नावातच सत्ता असल्याने ते ज्या कार्यकर्त्याला हात लावतील त्याचे ते सोने करतात हे वास्तव आहे.

# अखेर बोगस शि.वि.अ.सौ.सीमा खंडू टकले-काळे यांची मूळ पदावर हकालपट्टी..!

दै.आधुनिक केसरीचा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड :** गेल्या पाच-सहा वर्षांपासून अहमदनगर येथील विनय सेहगल तर आंबेजोगाई येथील अशोक केरबा घायाळ गुरुजी यांनी मूळ सहशिक्षक असलेल्या सीमा खंडू टकले-काळे या कशा बोगस शिक्षण विस्तार अधिकारी (शि.वि.अ.) आहेत. शिवाय त्या सेवाजेष्ठता यादीत नियमाधीन राहून या पदावर आलेल्या नसून त्या आपल्या पतिराजांच्या माध्यमातून एका माजी मंत्र्यांच्या कृपाशीर्वादाने कशा आलेल्या आहेत. ईतर अनेकजण नियमानुसार रांगेत असलेल्या सर्वसामान्य-गरीब शिक्षकांच्या मुंडक्यावर पाय देऊन कशाप्रकारे पदोन्नती घेऊन कशा पद्धतीने या निमाबाहेरील पदावर आलेल्या आहेत या विरोधात सारा लेखाजोखा मांडत सेहगल व घायाळ यांनी जिल्हा परिषद बीड कडे रीतसर तक्रार दाखल केली होती. तेंव्हापासून त्यांचा हा लढा सुरू आहे. सन 2014-15 मध्ये तत्कालीन सीईओ यांनी सीमा टकले-काळे यांची शि.वि.अ.पदाची नियुक्ती अयोग्य-बोगस असल्याचे आदेशित केले होते. परंतु सीमा टकले-काळे यांचे पती सुरेश काळे हे माजी मंत्री प्रा. राम शिंदे यांच्या कार्यालयात कामकाज पहायचे-करायचे अशी माहिती सूत्रांकडून कळाली असून बीड जि.प. मध्ये तर माजी मंत्री प्रा. राम शिंदे यांचे स्वीय सहाय्यक म्हणून सुरेश काळे हे काम करतात. असेच सांगितले जाते. या वावड्या आहेत का...? काय खरे, काय खोटे....?? हे जाणण्याची आवश्यकता नाही. हे एवढ्याच अनुषंगाने महत्त्वाचे आहे की, सौ.सीमा खंडू टकले-काळे यांचे पती सुरेश काळे हे माजी मंत्री शिंदे यांचे निकटवर्तीय असल्यानेच ही पदोन्नती मिळाली असावी अशी चर्चा सातत्याने ऐकावयास मिळते आहे. आणि प्रकरणातील अपील वेळेत निकाली काढण्यास विलंब झाल्याचे विनय सेहगल व घायाळ गुरुजींनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

नाट्यमयरीत्या चाललेल्या या प्रकरणामध्ये सीमा टकले-काळे यांनी न्यायालयात तसेच अप्पर आयुक्तांकडे अपील केले खरे, परंतु त्यांचे अपील टिकले नाही. न्यायालयाने नियमानुसार ते फेटाळत त्यांना अप्परायुक्त-औरंगाबाद यांच्याकडे दाद मागण्यास सांगितले. तर अप्पर आयुक्तांनी प्रकरण त्यांच्याकडे दाखल झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असे सांगत-आदेशित करत संबंधित प्रकरण जिल्हा परिषद बीड कडे परत पाठवले. उपलब्ध पुराव्यानिशी सगळीकडून संबंधित प्रकरणात जागोजाग सीमा टकले-काळे यांचे काळेबैरे बोगस-अपात्र शि.वि.अ. प्रकरण त्यांच्या अंगलट येत वा आले असतानाच अंबाजोगाई येथील अगदी कडक-शिस्तप्रिय, जुन्या काळानुरूप आपल्या नाकासमोर पाहून आपली शिक्षकाची नौकरी करणारे विद्यार्थी व पालकांसह गावकऱ्यांच्या नजरेतील एक आदर्श शिक्षक अशोक केरबा घायाळ (गुरुजी) जे की, जि.प. बीडच्या नजरेत गुन्हेगारी-तक्रारी वृतीचे आहेत. म्हणून ज्यांना जाणीवपूर्वक जि.प.तील कक्षाधिकारी जयलाल राजपूत, आरसुल पी.बी. ईतर मध्ये अजय बहीर, गणेश गिरी, शिवाजी अंडील, सुळे, माटे, ज्ञानेश्वर आगळे यांच्यासह अनेकांनी वेळोवेळी यातूनच त्रास दिला आणि मग शिक्षणाधिकारी आणि उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, सामान्य प्रशासन क्लार्क राठोड, शिक्षण विभागातील ईत्यादी मंडळींनी एकत्रित येऊन तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह आजचे उ.मु.का.अधिकारी प्रमोद काळे यांना हाताशी धरत वेळोवेळी त्यांच्याकडे चुकीच्या पद्धतीने कानात गोमाशा सोडत घायाळ गुरुजी विषयी त्यांचे कान भरत, डेप्युटी सीईओ प्रमोद काळे यांना आपलेसे करत, त्यांचा बाहुला म्हणून उपयोग करत याबद्दल सीईओ अमोल येडगे, ननावरे आणि सध्याचे अजित पवार यांची दिशाभूल DY.CEO प्रमोद काळे यांच्या माध्यमातून करत घायाळ गुरुजींना ईतके घायाळ केले की, त्यांना दोन-तीन वेळेला कारण नसताना खोटे-नाटे आरोप करत या ना त्या माध्यमातून निलंबित केले. त्यांच्यावर अपहारचा आरोप सिद्ध केला. हे ऐवढे ही झाले. तरीही त्यांनी अपहरणाच्या गरज






नसलेल्या, न खाल्लेल्या रकमा आपल्या पगारातून भरल्या. तरी या चांडाळ चौकडीचे प्रताप काही केल्या थांबले नाहीत. त्यांनी सीईओना अव्वाचेसव्वा सांगत घायाळ गुरुजींना सक्तीची सेवानिवृत्ती देण्यास भाग पाडले. केवळ दीड वर्षांची नोकरी राहिली असताना तब्बल 38 वर्ष ज्या माणसाने तन-मन-धनाने शाळा एक विद्यामंदिर आहे एवढेच लक्षात घेऊन अगदी बेडागपणे एक आदर्श शिक्षक तथा गुरुजी म्हणून सेवा दिली, नौकरी केली. त्या गुरुजीला मुख्याध्यापक होताच संधीचे सोने करत वेळोवेळी कशात न कशात अडकवून अत्यंत किळसवाणा असा महाभयंकर त्रास दिला आणि घरी बसवले. हा न्याय आणि अपमान गुरुजींना सहन झाला नाही आणि मग दोन-तीन महिने सातत्याने रुग्णालयाच्या चकरा मारून कसे बसे भान हरवलेले गुरुजी भानावर आले. ते नौकरीतून परतले-स्थिरावले खरे. परंतु त्यांच्या मनातील अन्याय-अपमान कदाचित स्थिरावत नसल्याने कुणालाही कधीही त्रास न देता ऐवढा अन्याय-अपमान माझ्या निशीबी आला असेल आणि सारकाही काळबैर करणाऱ्यांना मात्र काही होत नसेल तर मात्र आता गप्प बसून राहण्यात काही एक अर्थ नाही असा निर्धार करूनच घायाळ गुरुजींनी सातत्याने बदनाम करणाऱ्या आणि शासनाला मोठ्या प्रमाणात आर्थिक दृष्ट्या लुटून खाणाऱ्या जि.प.तील दरोडेखोरांची आणि बोगसरीत्या पात्र नसताना अपात्रपणे मुख्य पदांवर पदोन्नत्या-पदस्थापना घेतलेल्या अनेकांचे पितळ उघडे करुन ते आता सर्वसामान्य जिल्हावाशीयांच्यासमोर आणल्याशिवाय मी ही स्वस्त बसणार नाही. जणूकाही शपथ घेतल्यागत पक्का निर्धार केला आणि गेल्या वर्षा-दीड वर्षात त्यांनी सातत्याने ज्या ठकांच्या नावे बीड जिल्हा परिषदेशी संबंधित बातम्यांमधून नावं पुढे येत आहेत. त्या सर्वांच्या बाबतीत असंख्य असे पुरावे गोळा करून ठेवून त्यांनी दै.आधुनिक केसरीच्या माध्यमातून जवळपास गेल्या तीन महिन्यांपासून जिल्हा परिषद बीड विशेषतः शिक्षण विभागाची पोलखोल सुरू असून नुकत्याच सीमा खंडू टकले-काळे प्रकरणाप्रमाणे संबंधित नाम्मोलखीत सर्वांनाच तुरुंगामध्ये खडी फोडायला लावल्याशिवाय आता कदाचित स्वस्थ बसणार नसल्याची प्रतिक्रिया घायाळ गुरुजींनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

बरं ही चौकडी एवढ्यावरच थांबली नाही तर, सरसेनापती जयलाल राजपूत यांच्या मार्गदर्शनानुसार संविधानाचे जनक महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानुसार आणि शासन निर्णयानुसार हक्काचे असणारे सेवानिवृत्ती वेतन देण्यात ही दुनियाभराच्या खंडीभर अडचणी आणून ठेवत घायाळ गुरुजींवरील अन्यायाचा पाढा गिरवण्याचे काम चालूच ठेवले. परंतु अत्यंत कार्यतत्पर आणि कर्तव्यनिष्ठ कायद्याचा प्रचंड अभ्यास असणारे अभ्यासू अजित पवार यांची घायाळ गुरुजींनी थेटच भेट घेऊन त्यांच्यावरील एकंदरीत अन्यायाची करून कहाणी समक्ष मांडली आणि मग येथूनच आपल्यापर्यंत नसलेल्या काही बाबींचा उलगडा खुद्द सीईओ अजित पवारांनाही झाला. परंतु मुळातच मितभाषी असलेले अजित पवार यांनी याबाबत तक्रारदारासमोर काही एक न बोलता घायाळ गुरुजींची निवृत्तीवेतनाची फाईल मार्गस्थ करण्याचे आदेश दिले. आणि इतरही तक्रारींची दखल घेतली जाईल असेही आश्वासितही केले. आणि खरोखरच त्यानुसार म्हणजे त्यातीलच एक प्रकरण सीमा खंडू टाकले-काळे होय.....!

**सीईओ साहेब हकालपट्टी केल्याबद्दल खुप-खुप धन्यवाद....!!**

सीमा टकले-काळे यांना परत मूळ पदावर पदस्थापना देऊन त्यांची हकालपट्टी करत साहेबांनी सुरुवात अगदी जोरदार केल्याने इतर अशा बोगस ठकांच्या पायाखालची मात्र जमीन चांगलीच सरकली असून जि..तील वातावरण सध्या परिस्थितीला पाहण्यासारखे झाले आहे. तेंव्हा सीमा खंडू टकले-काळे यांच्या बाबतीतील बोगस पदोन्नतीची कहाणी आणि त्यांचे सखोल प्रताप आता शुक्रवारच्या अंकात आवर्जून वाचा. तसेच क कक्षा अधिकारी जय लाल राजपूत अर्जुन शालेय पोषण आहारासंबंधीतचे बहिर, धारूर येथील हंगामी वस्तीग्रह संबंधित गणेश गिरी शिवाजी गडदे, झोपतील कनिष्ठ वरिष्ठ क्लार्क राठोड, ज्ञानेश्वर आगळे, कादरी बोगस जात वैधता प्रमाणपत्रातील वैशाली आकुसकर, वर्षाराणी महाजन तर बोगस वेतन प्रकरणातील ज्ञानेश्वर वाघमारे, श्रीमती सुवर्णलता डोंगरे, मंगल बिचकुले, रंजना गायकवाड यांना मदत करणारे रंगनाथ राऊत, मुख्य सूत्रधार शिवाजी रोडे या सर्व चौकडीच्या बाबतीतील ऐक ना अनेक महाप्रतापी कारनामे वाचण्यासाठीही आपण न विसरता रोजच्या रोज वाचत रहा बेधडक दुनियेतील सडेतोड वर्तमानपत्र दैनिक आधुनिक केसरी......!!!!!.

(क्रमशः पुढील अंकात...)

## वडिलांच्या तेराव्या विधी निमित्ताने तेरा कुळातील यजमानांना वृक्ष वाटप

### कोठुरे येथील पाटोळे कुटुंबीयांनी दिला वृक्ष वाटपातून वृक्ष संवर्धनाचा संदेश



आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** अंत्यसंस्काराच्या वेळी मोठ्या प्रमाणात लाकडे जाळली जातात. त्यासाठी वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे नव्याने वृक्षलागवड व्हावी. त्याबाबतचा संदेश समाजात रुजावा, या उद्देशाने तेरावा विधी निमित्ताने शेतकरी संघर्ष संघटनेचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष संजय पाटोळे यांच्या वतीने वृक्ष वाटप करण्यात आले. कोठुरे गावातील शेतकरी संघर्ष संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष संजय पाटोळे यांचे वडील कै.भागूजी शिवराम पाटोळे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले, त्यांच्या तेरावा विधी निमित्ताने गावातील प्रत्येक कुळातील एका व्यक्तीला एक वृक्ष भेट दिले. दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन बिघडत असून जागतिक तापमानवाढीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. वृक्ष संतुलन राखले जावे, पर्यावरण जोपासावे यासाठी संजय पाटोळे यांनी नवीन पायंडा पाडत तेरावा विधी च्या निमित्ताने वृक्ष वाटप केले हे नक्कीच अनुकरणीय आहे असे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले.

गेल्या दोन वर्षापासून संपूर्ण जगासह राज्यातही कोरोनाने थैमान घातलेले असून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत अनेक रुग्णांना प्राणवायूची गरज भासली होती. त्याचा विचार करुन संपूर्ण मानव जातीने नैसर्गिक संपत्ती जोपासणे गरजेचे आहे. याकरीता वृक्ष संवर्धन ही काळाची खरी गरज आहे. त्यामुळे येणाऱ्या पिढीसाठी आपण निश्चितच योगदान देऊ शकतो, या भावनेने आपण वृक्ष वाटप केले असे संजय पाटोळे यांनी सांगितले.

**आज आमच्या परिवाराचे श्रध्दास्थान कै. भागुजी शिवराम पाटोळे (कोठुरे) याचा (तेरावा) विधीचा कार्यक्रम दुःखमय समयी निवासस्थानी संपन्न झाला. त्याप्रसंगी उपस्थित पुजनासाठी तेरा आडनावाच्या कुटुबांतील व्यक्तींना (आंबा) कलम रोपे देऊन पुजन करण्यात येऊन झाडे लावण्याचा संकल्प करण्यात येऊन वडिलांना हिच भावपुर्ण श्रध्दांजली लाभो ही प्रार्थना.**

**संजय पाटोळे (कोठुरे)**

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### पुरुषांमधील लैंगिक दोष...

आधुनिक केसरी

नऊ महिन्यांपर्यंत ते खाली आले नाहीत तर शस्त्रक्रीया करणे हाच त्यावरील उपाय असतो. टेस्टिकल पोटातच राहिली तर त्याचा परिणाम शुक्राणूंवर होतो. तसेच कॅन्सरचा धोकाही उदभवू शकतो.

**इंटरसेक्स :** बाळ जन्माला आल्यानंतर त्याच्या लिंगाचा आकार अर्धवट किंचा संमिश्न असल्यास त्वरित युरॉलॉजिस्ट व सेक्सॉलॉजिस्ट यांचा सल्ला घ्यावा. लहान मुलांमध्ये प्रामुख्याने अशा पद्धतीचे दोष आढळून येतात. आता आपण पुन्हा एकदा मोठ्या पुरुषांमधील दोषांसदर्भात जाणून घेऊया.

**कॉडर्डी ऑफ पेनिस :** ज्या पुरुषांच्या अवयवात जन्मजात वाकडेपणा येत असतो त्याला कॉर्डी ऑफ पेनिस असे म्हणतात. जन्मतःच काही लिंगे ही आकाराने लहान आणि त्वचेला चिकटलेली असतात त्यामुळे असे लिंग कठोरता आली की एका बाजूला झुकतात. वेळीच शस्त्रक्रिया करून हा दोष नाहीसा करता येतो.

**हायपोगोनॅडिजम :** काही हार्मोनल प्रॉब्लेम्समुळे अवयवाची योग्य वाढ होत नाही यालाच हायपोगोनॅडिजम म्हटलं जातं. हार्मोनल ट्रीटमेंट आणि शस्त्रक्रिया यांच्या माध्यमातून याही दोषांवर मात करता येते.

**व्हेरिकोसिल :** वंध्यत्व येण्यासाठी असलेल्या कारणांपैकी व्हेरिकोसिल हे सुद्धा एक कारण आहे. या दोषामध्ये अंडाशयाची नस आकाराने वाढते यामुळे वीर्याची गुणवत्ता घटून शुक्राणू कमी होणे, कमकुवत होणे किंवा पूर्णपणे नसणे अशा व्याधी उत्पन्न होतात आणि वंध्यत्व येते. यावर उपाय म्हणून जर मायक्रो सर्जरी केली तर वंध्यत्व निवारण होऊ शकते.

पुरुषांमध्ये आढळणाऱ्या अशा किती तरी दोषांवर, समस्यांवर रामबाण इलाज उपलब्ध आहेत. गरज आहे ती ज्ञानी होण्याची. आपल्याला कोणती तरी लैंगिक समस्या आहे आणि त्याकरिता मी तज्ज्ञ अशा सेक्सॉलॉजिस्टला दाखवणे गरजेचे आहे याची जाणीव होणे आवश्यक आहे.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## वृद्धाची ३ लाखांना फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** न्यूड कॉलच्या माध्यमातून एका ८६ वर्षीय वृद्धाची फसवणूक करत त्याच्याकडून तब्बल ३ लाख रुपये उकळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तर त्याच्याच शेजारी राहणाऱ्या ५८ वर्षीय व्यक्तीसोबतही असाच प्रकार घडला आहे. या वृद्धाची ६४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. अंधेरीत ही धक्कादायक घटना घडली आहे.

अंधेरीतील दोन शेजारच्यांसोबत न्यूड कॉलच्या माध्यमातून फसवणूक झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. अंबोली पोलिसांत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांचीही फसवणूक करणारी आरोपी एकच आहे की नाही याबाबत अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहे. ८६ वर्षांच्या वृद्धाला २८ जुलैच्या दुपारी वृद्धाच्या मोबाईवर अनोळखी नंबरवरुन व्हिडिओ कॉल आला. वृद्धाने तो व्हिडिओ कॉल रिसीव्ह केला. समोर बघितलं तर काय, समोरील कॉलर न्यूड होती. वृद्ध गडबडले. इतक्यात समोरील आरोपीने याकॉलदरम्यान वृद्धाचे काही फोटोही क्लिक केले. त्यानंतर त्या फोटोंच्या आधारे आरोपीने वृद्धाला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in